IRBK-0100987

# अंक पहिला

## प्रवेश पहिला.

[ मुंबई; गांवदेवी जवळील एक प्रशस्त बिल्डिंग; रस्त्या-
च्या बाजूचा Block; बाहेर गॅलरी; गॅलरींतून डाव्या
वाजानें आंत शिरल्यावर एक साधारण हॉल; अगदीं आधु-
क पद्धतीचें फर्निचर, मध्यभागीं एक वाटोळें टेबल, त्यावर
हीं वर्तमानपत्रें वगैरे पडलेलीं; आंत शिरतांच डाव्या
जूला दुसरें टेबल, भिंतीला टेकून ठेवलेलें व पुढें खुर्ची;
च्या डाव्या हाताला दोन दरवाजे; पैकीं पहिल्या दरवा-
तून आंत गेल्यावर एक लहान खोली ( Bed-room )
सऱ्या दरवाजानें आंत गेल्यावर दुसरी खोली (Bed-room);
न्ही दरवाजांच्या मध्यें भिंतीला टेकून एक टेबल मॉडेल
बसले... ; उजव्या कोपऱ्यांत कव्हर घालून ठेवलेली पायपेटी

आणि भिंतीला लागून एक दोन कपाटें वगैरे; किरकोळ प. सहा खुर्च्या मधल्या टेबलाभोंवतीं अव्यवस्थितपणें ठेवलेल्या.

जून महिन्यांतील शनिवार; संध्याकाळ झाली आहे. हॉल मधला मोठा दिवा लावलेला नाहीं. फक्त टेबलावरचा स्टँ लावलेला आहे. वर शेड असल्याकारणानें खोलींत सभों साधारण अंधार आहे. देवीदास टेबलाजवळ बसून कांहीं तें लिहीत आहेत. त्यांचें वय सुमारें ४५ च्या मानानें दिस पाटलोण, बूट वगैरे चढवून ते बसलेले आहेत. अंगांत नाहीं; डोळ्यांना चष्मा आहे. मिशा फार बारीक ठेवलेल आहेत. तोंडांत चिरूट आहे. एखाद्या कंपनीच्या मॅनेज प्रमाणें ते शोभत आहेत. खुर्चीच्या बाजूला गालिच्यावर प मॅटो व बेडींग बांधून ठेवलेलें आहे. साडेसहांचा ठोका पडत. देवीदास घड्याळाकडे पहातात व समोर पडलेले कागदपत्र आवरतात, आणि बांधून टेबलावर उघडून ठेवलेल्या हँडबॅग मध्यें भरतात; खूण घालून ठेवलेले एक इंग्लिश नॉव्हेल आं टाकतात. उठून कोपऱ्यांतील शेल्फवरचा चिरूटाचा डबा दाढीचें सामान आंत व्यवस्थित ठेवून बॅग बंद करतात. हॉलच्या दुसऱ्या दरवाजांत शांताबाई येतात. संध्याकाळच्या घरकामांतून उठून आल्याप्रमाणें त्या दिसतात. त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर ती एक साधी Matter of fact बायको असावीशी वाटते, आणि तशीच ती आहे. अंगावर ( मंगळ- सूत्राशिवाय ) कसलाच दागिना नाहीं. हातांत एक ए कांचेची बांगडी आहे. केस विसकटलेले आहेत. जर

[ध्य चाळीसाच्या मानानें असले तरी एकंदर चर्येवरून तीं तिशीच्या घरांत असावीशी वाटते. दरवाजाचे दोन्ही बाजूला हात धरून त्या उभ्या राहातात. ]

**देवीदास :** ( मागे वळून हँडबॅग उचलून खालीं सामाना-जवळ टेवीत ) शांता...... ?

**शांताबाई :** ( पुढं होऊन ) निघायचं झालं का ?

**देवीदास :** होय; शशिकान्त कुठं गेला ?

**शांताबाई :** क्लासमधें गेला आहे तो अद्याप आलेला नाहीं. आज जाणार तें त्याला माहीत होतं. अजून काय करतो आहे ? नाहींतर मित्रमंडळी भेटली असेल तो सिनेमाला गेला असेल. सिनेमाचं व्यसन कांहीं त्याचं सुटत नाहीं.

**देवीदास :** जाऊं दे. इथं राहून काय करणार होता ? माझं जाणंयेणं रोजचंच आहे. बाकी मुलं कुठं गेलीं ?

**शांताबाई :** कुठं चौपाटीच्या बाजूला गेलीं असतील. अचल घरांत आहे——

**देवीदास :** या पोरीला कुठं बाहेर जायला नको. सगळा दिवस घरांत बसून तिच्यानं राहावतं तरी कसं ?

**शांताबाई :** मी किती वेळां तरी सांगितलं कीं संध्याकाळीं कुठं तरी जा म्हणून. गायनाच्या क्लासाला जाते तें देखील मला वाटतं मोठं दिव्य करत्ये. एकसारखी पुस्तकांत डोकं घालून बसलेली असते. दोन पोरं दोन तऱ्हेचीं. एक आहे त्याला पांच

मिनिटं घरांत बसायला वेळ मिळत नाहीं. आणि ही आहे तिला बसल्या जागेवरून उठायला नको मुळीं. या वर्षी परीक्षेला बसणार नाहीं म्हणत आहे.

**देवीदास :** नाहीं तर नाहीं. सगळं त्यांच्याच मर्जीवर मीं सोंपवलं आहे. वाटल्यास कॉलेजमध्यें जा अगर नका जाऊं त्यांनीं आज काय करावं हें आपण सांगायला नको. मुलं वयांत आल्यावर आईबापांची जबाबदारी संपते.

[ वरील संभाषण चालू असतांना देवीदास कपडे करून निघण्याचे तयारींत राहतात. ]

**देवीदास :** शांता, गड्याला हाक मार. टॅक्सी बोलवायला सांग. चल झटपट; उशीर झाला.

[ शांताबाई जातात. देवीदास आरशासमोर उभे राहून कपडे पुन्हां नीट करतात. प दरवाज्यांतून अचल आंत येते. अचल ही सुमारें २३ वयाची आहे. ती अगदीं modern असली तरी al ;ation कमी असल्यामुळें तिला modern girl ह्म येत नाहीं. अंगावर सफेद पातळ व पोलका आहे. उज ातांत कांहीं नाहीं. डाव्या हातांत एक कचकडीची बांग ाहे. चेहऱ्यावरून ती फारच innocent दिसते. सध्या ॅशनप्रमाणें तिचा साधेपणा ओढून ताणून आणलेला नाही ळे पाणीदार आहेत. केसांच्या बटा डोळ्यांवर आलेल्या. आ ]

**अचल** : ( भीति आणि आदर यांनीं संमिश्रित अशा आवाजांत ) बाबा......

**देवीदास** : ( तिच्याकडे वळून ) होय, बरी आठवण झाली. हें बघ, त्या मोठ्या कपाटांत चेकबुक सही करून ठेवलं आहे म्हणून शशिकान्तला सांग. दुसरं असें पहा कीं या खेपेस मला नेहमीप्रमाणं लवकर येतां येणार नाहीं; तरी म्हणावं कुठं ट्रिप्‌बिप्‌ला जाऊं नकोस. कुणाचीं बिलं वगैरे द्यायचीं टेवूं नका.

[ शांताबाई येतात. गडी येतो व सामान घेऊन बाहेर जातो. तोंडांतला चिरूट फेंकून देवीदास दुसरा चिरूट पेटवतात व बाहेर जातात. अचल व शांताबाई त्यांचे मागून जातात. खालीं रस्त्यावर मोटार निघाल्याचा आवाज. अचल पुन्हा हॉलमध्यें येते. तिच्यामागून शांताबाई येऊन तडक दुसऱ्या खोलींत जातात. अचल टेबलावरील वस्तू नीट ठेवते. हार्मोनियमचें कव्हर काढून झाडते व स्टूल अलीकडे ओढून त्यावर ती बसते. वर ठेवलेली नोटेशनची वही उघडून ठेवते व वाजवीत गात बसते. थोडा वेळ गेल्यावर गॅलरींतील दरवाज्यावर थाप ऐकूं येते. अचलचें लक्ष नसतें. पुन्हा थाप. नोरेन दरवाजा लोटून दिवाणखान्यांत शिरतो. दरवाजा उघडल्याच्या आवाजासरशी अचल तंद्रींतून जागी होते व एकदम उठून पदर सांवरून उभी राहते. नोरेन तिला पाहतांच दरवाजांतच थांबल्यासारखा उभा रहातो. नोरेन हा एक २३।२४ चे मानाचा होतकरू तरुण आहे. अंगांत सूट आहे. डोकीला हॅट नसून फरकॅप आहे.

हातांत कसलं पुस्तक कीं मॅगेझीन घडी करून धरलेलें आहे. उजवा हात अजून दारावर आहे. तो वर्गानें इतका चांगला नाहीं; पण नाक आणि डोळे फारच Artistic असल्यामुळें पहिल्या दृष्टीला तो अगदीं Impressive दिसतो. पण तडफदार दिसत नाहीं. जरा shy आणि nervous दिसतो. वाटेल तेव्हां वाटेल तो विकार चेहऱ्यावर दाखविण्याची आजकालची नवीन हातोटी त्याला साधलेली नाहीं, अगर तसं करण्याची त्याची इच्छा नाहीं. पण तो निर्विकार दिसतो इतकें मात्र खरें. दरवाजा उघडल्यावरोबर त्याची निराशा होते. कारण शशिकान्त वाजवित बसलेला असेल अशी त्याची कल्पना असते. तो परत फिरण्याच्या बेतांत असतो. पण केवळ शिष्टाचार पाळण्याच्या हेतूनें— ]

**नोरेन :** Excuse me. मला वाटलं की शशिकांत बसलेला आहे. साडेसहांचे पुढें आपण घरीं असणार म्हणून मला बोलला होता.

**अचल :** भाई क्लासला म्हणून गेला आहे तो अजून आलेला नाहीं. सिनेमाला तर निघून गेला नसेल ना ?

**नोरेन :** असेल. त्याचं काय, लहरी माणूस तो. बरं मी आलों होतों म्हणून सांगा त्याला. I am sorry I had to interrupt you ( तो दरवाजाचे बाहेर जाऊन पुन्हा दरवाजांत येतो. ) अरेच्या ! हें काय ! पाऊस जोराचा आला. ( तो उभा राहतो. )

अचल : ( पाहून ) खरंच पाऊस जोराचा आला. भाईनं ओव्हरकोट नेलेला नाहीं. आपल्याला आणून देऊं का ?

नोरेन : नको. उद्यां पुन्हा ओझं आणलं पाहिजे. मी थांबतों थोडा वेळ. मुंबईचा पाऊस कितीही मोठा असला तरी पांच मिनिटावर राहाणार नाहीं. (अचल एक खुर्ची पुढं करते.)

अचल : बसा ना इथं आत. ( तो बसतो. ती आंतल्या दरवाजानें घरांत निघून जाते. तो टेबलावरचीं वर्तमानपत्रें चाळीत बसतो. शांताबाई येतात. दरवाजांत पाठीमागें हात घेऊन उभ्या राहातात. )

शांताबाई : नोरेन, आज पावसामुळं तरी पांच मिनिटं थंड बसलां. नाहींतर नेहमीं तुम्ही म्हणजे अगदीं गर्दीत दिसायचे. आमचा शशिकांत दोन वाजतां गेलाय क्लासला म्हणून तो आतां सात वाजले तरी त्याचा क्लासच चालला आहे. एकदां आपली मंडळी भेटली कीं मग त्याला घरादाराची सुद्धां शुद्धि राहात नाहीं. आज पुन्हा फिरतीवर जायचं तर हा आपला घरांत नाहीं. हें वाद करीत फिरण्याचं आणि सिनेमाचं वेड त्याचं केव्हां सुटणार देव जाणे. ( जरा पुढें होऊन ) काय हो तुम्ही आतां विलायतेला केव्हां जाणार ? म्हणजे—आधीं लग्न उरकून घेणार कीं मग तिकडून आल्यावर लग्नाचा बेत आहे ? ( तो लाजतो. ) उद्यां आतां बॅरिस्टर होऊन आल्यावर आम्हां

गरीबांना तुम्ही कुठले दिसायला ? आमचा शशिकांत दिखील अलीकडे म्हणतो आहे. आपण जॅर्नेलिझम कीं काय तें शिकण्यासाठीं कांहीं महिने तरी तिकडे काढून येतों म्हणून. पण असं पहा, आम्हां मध्यम स्थितींतल्या माणसांना तें जरा जडच नाहीं का ? उगीच हट्टास पेटून दुसऱ्याचं कर्ज काढून तिकडे जाऊन आल्यानं झालं नाहीं ? पुढं पैसा मिळवायचं बाजूलाच राहिलं पण खर्च तरी सुटेल कीं काय याचा आपण विचार करायला नको का ? तुमचं तरी काय ? सासरहून पाठवायचं नसतं तर आपण होऊन कांहीं तुम्हीं जाण्याच्या भरीस पडलां नसतां. तुमची एंगेजमेंट ऐकली तेव्हां आमच्या घरांत किती आनंद झाला म्हणून सांगू ? शशिकांत धड जेवलासुद्धां नाहीं. तुम्ही कांहीं आम्हांला परकी नाहींत. आम्हांला तर तुमच्याबद्दल —( अचल दरवाजांत येऊन आईला खुणावते. ) हो काय तरी बाई. हें पहा मी आलें होतें एवढ्याचसाठीं कीं आज तुम्हीं अनायासं बसलां आहांत तेव्हां अचल म्हणते कांहीं तरी गाऊन दाखवा. आमच्या घरांत हीं दोन्ही पोरं क्लासला जायला लागल्यापासून कुटुंबाला एकाद्या नाटक कंपनीची कला आलेली आहे. शशिकांत पूर्वीं तुम्हाला गायला बसवावयाचा; पण हल्लीं गाणं नाहीं, कांहीं नाहीं. फक्त मोठमोठ्यानं तुमचे वाद मात्र चालत असतात. उठा आतां, बसाच पेटीवर. मलाही थोडी

मोकळीक आहे—( तो मागें पुढें करीत उठतो व स्टूलावर जाऊन बसतो. अचलनें वर टाकलेली नोटेशनची वही चाळून पहातो. ) काय हो नोरेन, तुम्ही हल्लीं गोष्टी वगैरे लिहीत नाहीं वाटतं ? माझ्यानं अलीकडे वाचवतच नाहीं; पण तुमचा लेख असला कीं, आमच्याकडे प्रत्येकजण अगदीं सैंपाक खोलीपर्यंत आणून आपापल्यापरी नव्याईनं वाचून दाखवतात.

[ तो पेटीचा सूर धरतो. शांताबाई अचलला आंत बोलावून बसायला सांगतात. ती खुर्चीच्या आर्मवर बसते, तो गातो. तो गात असतांना अचलच्या चेहऱ्यावर एक प्रकारें समाधानाची छटा येते; ती अगदीं तन्मय होते. आईच्या तें लक्षांत येत नाहीं. नोरेन तिची हालचाल बारकाईनं पाहातो. थोड्या वेळानें शांताबाई उठून आंत जातात. नोरेन व अचल तेथेंच असतात. पद संपतां संपतां दरवाजा उघडून शशिकांत व दोघे तिघे मित्र आंत येतात व खोलींत एकच गलबला करून सोडतात. अचल एकदम स्वतःला सांवरून घेऊन आंत जाते. नोरेन उठून घाबरल्यासारखा उभा राहातो. शांताबाई चहाचा कप घेऊन दरवाजांत येतात, व मंडळी पाहून तेथेंच थबकतात. शशिकांत तो कप तिच्या हातांतून घेऊन नोरेनच्या पुढें करतो. नोरेन तो खाली ठेवायला सांगून गोंधळल्यासारखा राहातो. कांहीं वेळ गलबला नंतर—]

**शशिकांत :** नोरेन, तूं पी तो चहा. आई आणील आमच्यासाठीं मागाहून. आम्ही नुकताच घेऊन आलों आहोंत

तुला मीं इथं बोलावला आणि क्लासनर ह्या स्वाऱ्या भेटल्या तो तिथूनच सिनेमाला गेलों. यांना जाणार होते त्यासाठीं मी इकडे यायचा विचार केला होता पण मलाही सिनेमाला जायचा मोह आवरला नाहीं. तूं केव्हांसा आलास ? तुला तिष्ठत बसावं लागलं असेल नाही ?

शांताबाई. ते मुळीं बसायला तयार नव्हते. पण बाहेर निघायला आणि पाऊस जोराचा यायला एकच गांठ पडली. छत्रीशिवाय निघायचं हा तुमचा संकल्प आहे. तेव्हां इथं अनायासं बसलेले पाहून अचल म्हणाली त्यांना गायला सांग; ( इतर मित्र एकमेकांकडे बघतात. ) तेव्हां मी यांना गायला बसवलं. आजकाल ते बाबा मोठे लोक. वेळाची सुद्धां काटकसर करतात आम्हा गरिबांचे घरीं. त्यांना अजून परकीपणा वाटतो इथं.

शशिकान्त. त्याला वाटायचाच. आतां इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन येणार म्हणे. काय दिवे लावणार रे तूं इकडे येऊन ? मुख्य मुद्याची गोष्ट म्हणजे तूं माणसं पाहून nervous होतोस. करणार आहेस काय पुढं ?

[ तो चहा पितो. शांताबाई कप घेऊन जातात. ]

कुमार : नशीब बिचाऱ्या त्या सासऱ्याच्या पोरीचं. काय हौसेनं तिनं असा हा मुलखुर्दुळ नवरा पसंत केला कोण जाणे !

शशिकान्त : नोरेन, I pity their lot. अरे

कशाला उगीच त्यांचा पैसा खर्च करून जातो आहेस? तेवढा पैसा जर आमच्याकडे देशील तर एक झणझणीत वर्तमानपत्र तरी चालवतां येईल.

**कुमार :** आणि आपलं वर्तमानपत्र चाललं तर आपलं वाङ्मय तरी पुढं आणतां येईल. तुझं तें पुस्तक लिहून धूळ खात पडलं आहे. आपले हे विचार आणि मनं पाहिलीं कीं कुठला छापखानेवाला जवळसुद्धां उभे करीत नाहीं आपल्याला. शशिकान्त, तूं आतां एकादा छापखानेवाला सासरा बघ; त्याशिवाय तुझीं पुस्तकं या जन्मीं तरी छापून निघण्याचा योग दिसत नाहीं.

**रमण :** पण तुम्हांला असले विचार मांडायला सांगितले कुणी? चांगलं लोकांना आवडेल असं कांहीं तरी लिहावं आणि पहिल्यानं नांव मिळवावं. मग तूं जरी वाटेल तें लिहिलंस—

**नोहन :** तरी लोकांना आवडेल तें असं तुझं म्हणणं कीं काय?

**रमण :** तसं नव्हे रे. पण निदान याच्या नांवावर छापून तरी निघेल ना? फार तर जास्त टीका होईल पण कुतूहल-बुद्धीनें तरी लोक पुस्तकं विकत घेणार. पण तेंच आज तूं कितीही चांगलं लिहिलंस आणि त्यांच्यांत अगदीं literary qualities जरी भरपूर असल्या तरी तुझ्याकडे कोण लक्ष देणार नाहीं.

**कुमार :** हो म्हणे कोण लक्ष देणार नाहीं अरे—

**शशिकान्त :** अरे हें कुठवर चालायचं ? तूं स्वतःच्या घरीं बसून जर बोलूं लागलास तर एक लोक लक्ष देणार नाहींत. पण तेंच जर पडदा बाजूला सारून तूं लोकांचे पुढं येऊन उभा राहिलास तर लोक कांहीं मुद्दाम डोळे मिटून घेणार नाहींत खास. आपण ठरवून टाकलं आहे कीं दुसरे जोंपर्यंत आपण होऊन आपल्याकडे लक्ष देत नाहींत तोंपर्यंत आपणच आपली टिमकी वाजवून त्यांचं लक्ष ओढून आणायचं आणि असले प्रयोग यशस्वी झाल्याचीं उदाहरणं दाखवतों.

**कुमार :** ( मोठ्या आवेशानें ) Hear, Hear ! ! अरे जिथं आपल्याकडील विद्वान् वाचकांचें कुठल्यातरी काल्पनिक ठकसेनाच्या पोवाड्यांवर आणि कहाण्यांवर समाधान होत आहे तिथं तुझ्या literary qualities ची गरज कुठं राहिली ? पहा आतां—

**चंदु :** (त्याला मध्येंच थांबवून) उद्यां पाहतों. आतां चूप बस बघूं. उठल्यासुटल्या वादविवाद सुरू करायचे. आतां पहिल्यानं जो वाद उकरून काढील त्याचं टाळकं सडकतों बघा. शशिकांत, तें कॅरमटेबल पुढं घे. मला खेळायची फार लहर आलेली आहे. (शशिकान्त उठून कॅरमटेबल पुढं आणतो व खुर्च्या उचलीत असतां—)

**शशिकान्त :** सगळं खरं पण चौथा कोण ?

**चंदु :** अरेच्या अडचण आहे खरी. आज मोहनची स्वारी कुणीकडे झुकली ? (कुमार आणि रमण यांच्याकडे पाहून) हे दोन बैलोबा जगांत असून नसून सारखेच.

**रमण :** कॅरम खेळण्यासाठीं मनुष्य जन्माला येत नसतो.

**चंदु :** माहीत आहे पण दोन वेळ यथेच्छ खाऊन म्युनिसिपालटीला उद्योग लावण्यासाठींही तो जन्माला येत नसतो.

**रमणः**--( किंचित् आवेशानें ) तर मग जन्माला येतो कशाला मनुष्य ?

**कुमारः**--अरे, त्याचं बरोबर आहे. एकच विवक्षित गोष्ट करण्यासाठीं मनुष्य जन्माला येत नाहीं. सगळ्या गोष्टी थोड्या फार प्रमाणांत अंगीं असाव्या लागतात. आतां आपण एक उदाहरण घेऊं—

**नोरन**--शशिकांत, तेथलं स्टूल उचलून घाल डोक्यांत एकेकाच्या. पुन्हा बडबड सुरू झाली.

**कुमारः**—आतां तोंड बंद, अजिबात बंद.

**चंदुः**—पण खेळणार कसं तिघांत ?

**शशिकान्तः**—थांब अं. ताई, अग ताई, इकडे ये बघूं. (अचल येते.) हें पहा आमचा एक गडी कुठं आज गडप झाला आहे. त्यासाठीं आह्मांला एक पार्टनर हवा आहे. तूं इथं बस पाहूं. (चंदूस उद्देशून) चंदू, तूं माझ्यासमोर बैस.

आपली जोडी कायम राहिली पाहिजे. ताई, आपल्यापेक्षां फार चांगली खेळते हो. ताई आणि नोरेन पार्टनर व्हा. दोघेही मुखस्तंभ आहांत; बरी जोडी जमली. (ते बसूं लागतात.)

**कुमार :** अहो रॅशनॅलिस्ट, निसर्गांतून मनुष्य अवतरला त्यावेळीं कॅरम टेबलं नव्हतीं.

**रमण :** पण मनुष्य निसर्गांतून अवतरला कशावरुन ?

**शशिकान्त :** ( ओरडून ) तुमच्यावरुन. आणि त्याची खात्री ह्या तुमच्या बडबडीवरुन चांगलीच पटते आहे. मनुष्य हा उत्क्रांत पशू आहे हें तुमच्या संगतींत पांच मिनिटं बसल्यानें वाटेल त्या नास्तिक माणसाच्या प्रत्ययाला येईल. उठा बघूं दोघेही. बाहेर गॅलरींत जाऊन बसा, आमचा खेळ संपला कीं तुम्हांला आंत बोलावूं—( थोडा वेळ विचार करून ) नाहीं तर तसं नको. नोरेन, आपणच आंत माझ्या खोलींत जाऊन बसूं. त्यांना इथंच बसूं देत. भांडा नाहीं तर एकमेकांच्या मानगुटीला बसा. तुमच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. ( कॅरम टेबल उचलून आंत नेतात. मागाहून अचल जाते. शशिकांत पुन्हां बाहेर येतो, व खुर्ची उचलून आंत नेतां नेतां—) आतां वाटेल तेवढ्या मोठ्यानं ओरडा. अगदीं Full freedom आहे तुम्हांला. ( तो जातो. जातांना दरवाजा बंद करून घेतो. )

**कुमार :** चल रमण, आपण पुढं त्या मोठ्या दरवाजा-

जवळ बसून बोलूं म्हणजे कोण आलं तर चटकन कळेल तिथून.

( ते पुढे येऊन बसतात. दोन मिनिटं स्तब्धता. )

**कुमार :** रमण पाहिलंस ना ? आतां तरी खात्री झाली ? हळुहळू सुधारणा होते म्हणतात ती ही अशी.

**रमण :** कायरे एक बारीक गोष्ट तुझ्या नजरेस आली का ?

**कुमार :** कोणती ?

**रमण** नोरेननीं पार्टनर हो म्हटल्याबरोबर अचल तयार झाली. तीच जर चंदूची पार्टनर व्हायला तिला सांगितलं असतं तर कबूल झाली असती का ?

**कुमार :** न व्हायला काय झालं ? कुठून तरी खेळायचं मग कुणीहि पार्टनर का असेना—

**रमण** चल पुढं बोलूं नकोस अगदीं. आजपर्यंत ती कधीं आपल्यांत येऊन बसली होती का ? आज बऱ्याच दिवसांनीं आली—

**कुमार :**— कांहीं तरी भलतेच तर्ककुतर्क काढूं नकोस. नोरेनचा आणि तिचा काय संबंध ?

**रमण :**—संबंध काय असणार ? पण तूं कांहींही सांग मी हजार हिश्शांनीं सांगतो नोरेनला पाहिला कीं अचलची कळी खुलते. मी त्यांना दोष देत नाहीं.

**कुमार :**—दोष देत नाहींस तर ही चर्चा कशाला ?

**रमण :**—नोरेनची engagement ठरली असतांना

त्याच्यावर हिनं प्रेम करणं कससंच दिसतें--

कुमार --पुन्हां आलं प्रेम. माफ कर माझे आई, पण तो शब्द पुन्हां माझेसमोर उच्चारूं नकोस. प्रेम, प्रीति, प्रणय, अशा तऱ्हेचे शब्द ऐकले कीं माझं कपाळ फिरतं बघ. बरं, लग्न झालेल्या स्त्रीपुरुषांनीं दुसऱ्या माणसांशीं सलगी ठेवूं नये कीं काय ?

रमण : त्यांनां तसं करण्याचं कारण नाहीं.

कुमार : तूं नेहमीं माझ्याबरोबर फिरतोस. आपली एवढी सलगी आहे; पण उद्यां तूं तिसऱ्या एकाद्या इसमाशीं बोलत चाललास अगर हातांत हात घालून फिरायला लागलास तर मला राग कां यावा ? लग्न झालं अगर लग्न ठरलं म्हणजे त्या स्त्रीपुरुषांनीं बोलण्याचालण्याचा कसलाच व्यवहार दुसऱ्यांशीं करूं नये म्हणून कोणी सांगितलं आहे ?

रमण: पण तो नीतीचा मोठा गुन्हा होतो.

कुमार : अरे बापरे ! असे नीतीचे नियम तरी काय आहेत तें कळूं दे.

रमण : नियम पुष्कळ घालून दिले आहेत.

कुमार : पण ते कुणी घालून दिले आहेत ?

रमण : अर्थात् त्यावेळच्या तज्ज्ञांनीं.

कुमार . ते कुणासाठीं घालून दिले ?

**रमण :** आपल्यासाठीं आणि पुढील लोकांसाठीं—

**कुमार :** पुढील लोकांसाठीं नियम घालून देण्याचा त्यांना कुणी हक्क दिला होता, बरं त्या कौन्सिलमध्यें कोण कोण तज्ज्ञ होते, कुठल्या धर्माचे कुठल्या पंथाचे किती प्रतिनिधी होते, किती पुरुष होते, किती स्त्रिया होत्या, कांहीं माहिती तर कळूं दे खरी.

**रमण :** सनातन धर्माभिमानी होते आणि त्यांत पुरुष होते यांत शंका नाहीं. पण स्त्रिया होत्या कीं नाहीं—पण बहुतेक नसाव्यात.

**कुमार :** (जणूं काय मुत्सद्दी बाण्यांत) जर स्त्रिया नव्हत्या तर पुरुषांनांच त्यांनीं आपलं प्रतिनिधित्व दिलं होतं कीं काय ?

**रमण :** तसं कशाला करतील ! त्या स्वतांच हजर राहिल्या असत्या. आणि दुसरं असं पहा, जर स्त्रिया असत्या प्रतिलोम विवाहाला आडकाठी घालून आपल्या पायांवर त्यांनीं दगड पाडून घेतला नसता. मला वाटतं त्यांना वगळलं असावं.

**कुमार :** हं ! आणि स्त्रियांना वगळून पुरुषजातींत सर्व साधारण नीतीचे नियम आपल्या स्वतांच्या अधिकारावर घालून दिले आणि ते posterityनं पाळावेत असं हो म्हणून ठेवलं ! बरं कल्पना कर ते नियम पाळले नाहींत तर

काय होईल ?

**रमण :** सगळा भ्रष्टाकार होईल. कुणाला कोण जुमानणार नाहीं. समाजाची घडी विस्कळून जाईल. इतकंच काय पण समाज नष्ट होईल.

**कुमार:** तसं झालं तरी वाईट काय ?

**रमण :** (चिडून आवेशानें) वाईट आणखी काय होणार ? अरे, आपला अधःपात होईल. आम्हीं मनुष्य पशुतुल्य होऊं.

**कुमार :** (तितक्याच थंडपणानें) मग त्यांत काय बिघडलं ?

**रमण :** (दांत ओंठ चावतो.) काय बिघडलं ? कुमार, तूं शुद्धीवर आहेस का ? किती पागल विचार आहेत तुमचे ! अरे इतका गोंधळ उडून जाईल कीं आपल्या बायकांवर आपली सत्ता राहाणार नाहीं. बळी तो कान पिळी अशी स्थिती होऊन जाईल—

**कुमार :** तेंच तर झालं पाहिजे. ( रमण कानावर हात ठेवतो. ) पण महाराजा, नवराबायको, बाप बहीण वगैरे नातीं त्यावेळीं राहाणार नाहींत. आतां बळी तो कान पिळी ही स्थिती येईल; पण त्यालाच आपण Survival of the fittest म्हणतों आणि आमच्या मतें तसं झाल्याशिवाय प्राणिमात्राला खरी शांति मिळणं शक्य नाहीं. तुझ्यामाझ्यासारखे चार अजागळ या जगांतून नाहींसे झाले तर जगाला त्यापासून कांहींच धोका पोंचणार नाहीं. निसर्गातून मनुष्य निर्माण झाला त्यावेळीं

आपल्यासारखा तो खात्रीनं नव्हता. पण आपण आपल्या बुद्धीची घमेंड मारून आपली स्वतांची विपरीत दशा करून घेतलेली आहे. तुझ्यासारखे सुशिक्षित तरुण आज आहे ती समाजव्यवस्था कायम राहिली पाहिजे, जरी मग त्यांत कांहीं जीव नसला तरी चालेल, अशा वृत्तीचे निपजतात त्यामुळं——

**रमण :** पुरे पुरे ! बस्स झाले तुझे विचार. आपल्यानं असल्या घाणेरड्या विचारांवर वादविवाद करवत नाहीं.

**कुमार :** ( शांतपणानें ) तरीही हरकत नाहीं.

**रमण :** तुमचं हें Revolution कुठल्या घराला जाईल देव जाणे !

**कुमार :** कुठला देव——( तो पोट धरून मोठमोठ्यानें हंसतो. )

**रमण :** ( कपाळाला आंठ्या चढवून ) आतां जगांत देव नाहीं म्हणून सांग——

**कुमार :** आजच कां ? सांगतोंच आहे इतके दिवस. पण तुला कळत नाहीं आणि तूं ऐकून घेत नाहींस त्याला मी काय करूं ? आजपर्यंत First class career काढून सुद्धां शुद्ध दगड राहिला आहेस !

**रमण :** असूं दे ! हें आधीं सगळं निर्माण कुणी केलं ? बरं तुला निर्माण कुणी केला ?

**कुमार :** मला होयं, निसर्गानं—

**रमण :** तें मला कांहीं समजत नाहीं—

**कुमार :** बरं एका स्त्रीनं आणि एका पुरुषानं. त्या स्त्रीला लोक माझी आई म्हणतात आणि पुरुषाला लोक माझा बाप म्हणतात.

**रमण :** किती vulgar आहेस तूं ?

**कुमार :** स्पष्ट बोलणं म्हणजे vulgarity नव्हे. हाही नियम पूर्वीच्याच लोकांनीं घालून दिला कीं देवानं ?

**रमण :** सभोंवार हें सगळं जग चाललें आहे त्याचा उगम कशांत आहे ? ---

**कुमार :** माझ्या मतें science मधें आहे. ईश्वराकडे— त्याचा काय संबंध ?

**रमण :** मग तर तुमच्या मतें ईश्वर म्हणजे तरी काय ?

**कुमार :** हं, असा ताळ्यावर ये. ईश्वर म्हणजे तुमचं मूर्तिमंत अज्ञान. God is nothing but the weak in man समजलास. ज्यांना science चा गंध नाहीं अशा तुझ्यासारख्या लोकांनींच ईश्वराला कल्पनेंतून निर्माण केला आहे. आतां अद्याप कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्यांची समाधानकारक माहिती मिळत नाहीं. पण जसजसा science चा Progress होत जाईल तसतसा त्याही गोष्टींवर नीट

प्रकाश पडेल ही माझी खात्री आहे. उदाहरणार्थ, तूं जर उद्यां आकस्मिक मेलास तर तुझ्या शरीरांत कमीअधिक झालेलीं शारीरिक द्रव्यं भरून तुला पुन्हा जिवंत करतां येईल कीं नाहीं हा आतांपर्यंत प्रश्न आहे. पण आज ना उद्यां science तो सोडवणार. तुझ्यासारखे educated—cultured नव्हे बरं का, कारण उच्च शिक्षण घेतलेले लोक cultured असतातच असा नियम नाहीं—जर असं म्हणूं लागले तर राहिलेल्यांनीं काय म्हणावं ? Spinoza म्हणतो—

**रमण :** म्हणूं दे वाटेल तें. मला कुणाचा आधार नको. असल्या पोकळ कल्पनांनीं माझं समाधान होणार नाहीं. मला सायन्सवर विश्वास ठेवण्यासाठीं तसंच एकादं उदाहरण दाखवून खात्री पटवून दे—

[ तो बोलत असतां मध्येंच थांबतो. कारण बाहेर कुणाची तरी चाहूल ऐकूं येते. थोड्या वेळानें शिरीन आंत येते. ती जवळजवळ अचलच्याच वयाची आहे. ती एक typical modern girl दिसते. हातांत पुस्तकें, हत्यारांची पेटी व स्टेथॉस्कोप आहे. छत्री मिटून धरलेली आहे. आंत येऊन हातांतलें साहित्य ती टेबलावर ठेवते व ओव्हरकोट काढते. ]

**कुमार :** काय शिरीन, तुम्ही आतां कॉलेजमधन येतां आहां ?

**शिरीन :** आज मला duty होती. तिकडून आम्ही

Boarding पर्यंत गेलों आणि तिथून ही आतां येतें आहें. आज बाकी मंडळी कुठं—( तो तिला खुणेनें मंडळी पली-कडील खोलींत खेळत आहेत म्हणून सुचवतो. ती बूट काढून ठेवते व सगळें सामान घेऊन दुसऱ्या खोलींत जातां जातां– ) तुम्ही अरसिक लोक खरंच—

**कुमार :** तसं कांहीं म्हणायला नको. कारण आम्हीही इथं आमच्या जिवाची करमणूक करीत होतों. ( ती जाते. ) बरं रमण, तें सगळं आतां विसर. मूळ मुद्दा काय बरं होता ? हं नोरेन आणि अचल. मी तुला खरं सांगू, माझ्यासुद्धां तें नज-रेला आलं आहे. पण मला त्याच्यांत कांहींच वाटत नाहीं. कारण नोरेन म्हणजे पहिल्या प्रतीचा Nervous मनुष्य आहे. चुकून कुठं तो पुरुषाच्या जन्माला आला—

**रमण :** पण प्रत्येकाला कांहीं तरी duty म्हणून अस-वेच कीं नाहीं ?

**कुमार :** मघांची नीति त्यांतलीच ही duty. दुसरं काय ?

**रमण :** पुन्हा आपला topic त्याच line वर चालला. असो, पण नोरेनच्या चेहऱ्यांत कांहीं तरी जादु आहे खास. अरे स्त्रियांवर Impression पडलं तर नवल नाहीं, पण पुरुषांवरसुद्धां पटकन त्याचं इतकं Impression पडतं कीं,

त्याचं मला नवल वाटतं.

**कुमार** : नोरेनचा चेहरा फारच गोड आहे. कुणाला केव्हांही त्याच्याकडे पाहिल्याबरोबर अनुकूल ग्रह होऊन पांच मिनिटं बोलत राहावंसं वाटतं. अचल तर बोलून चालून एक स्त्रीच आहे आणि त्यांतून sentimental—

**रमण** : तुझं दिखील observation फार कडक दिसतंय !

**कुमार** : अं–! अरे कुणाही स्त्रीला अगर पुरुषाला पाहिल्याबरोबर मी त्यांचा स्वभाव ओळखूं शकतों. आपल्या मित्रमंडळींत नोरेन तेवढा या बाबतींत पक्का चलाख आहे. शशिकान्त थोडाबहुत आहे पण त्याच्यापेक्षां किती तरी पटीनं तो जास्त हुशार दिसतो. नाहीं तर तुम्हीं आहांत. कॉलेजच्या अर्धा डझन पुस्तकांपलीकडे तुमचं वाचन नाहीं, ज्ञान नाहीं, विचार करणें नाहीं, मग मनं इतकीं कच्चीं राहिलीं तर आश्चर्य नाहीं. वाच, पुष्कळसं वाच, आणि विचार करायला शिक. जितका जास्त विचार करशील तितका जास्त सुधारशील.

[ शिरीन आंत येते. तिच्या मागून गडबड करीत खेळत असलेली मंडळी येतात. शशिकान्त व नोरेन आंतून खुर्च्या ओढीत आणतात. कुमार व रमण उठतात व पुढं येतात. शशिकांत व शिरीन मधल्या टेबलाभोवतीं सगळ्या खुर्च्या

मांडतात व टेबल साफ करतात. एकेकजण खुर्चीवर बसतात. अचल चहाचा ट्रे घेऊन येते. व टेबलावर ठेवून जाऊं लागते. शिरीन तिला खुणेनें थांबवते व पेल्यांत चहा ओतायला सांगते. अचल चहा ओतते व शिरीन एकेक कप उचलून प्रत्येकाच्या हातांत देते व आपण घेते. सर्व चहा पितात. ]

**कुमार** : (चहाचे घुटके घेत) शशिकांत, हें पहा. आपल्या मंडळींत आपण असा एक नियम केला पाहिजे कीं प्रत्येकानं दर आठवड्याला कांही निवडक लेखकांच्या पुस्तकांपैकीं निदान एक तरी पुस्तक वाचून त्यावर वादविवाद करण्याइतका विचार केला पाहिजे. तुमच्या खेळामुळं आम्हां अर्ध्या लोकांना इथं पोकळ गडबड करीत बसावं लागतं. मघां कीं नाहीं हा आमचा धर्ममार्तंड dogmat अशीं एकेक arguments काढीत होता कीं त्याचं समाधान कसं करावं हें मला कळेना. Logic तिथं उपयोगी पडत नाहीं. बरं चांगले चांगले authoritative thinkers quote करावेत तर या लेकाचं वाचन Prescribed booksच्या पलीकडे गेलेलं नाहीं. म्हणून केव्हां केव्हां बोलण्याचा मुद्दा मागं घेऊन मला याच्यापुढं हात जोडावे लागतात. वाचनानं विचारशक्ति वाढते म्हटलं तर यांना पटत नाहीं.

**शशिकान्त** : ह्या रमणनं मला वाटतं बी. ए. त

economics ची बुकं आणि आतां law books घोकून बेटा, फक्त परीक्षा पास होतो आहे. त्याच्यापलीकडे जगांत काय चाललं आहे हें समजून घेण्याचीसुद्धां त्याची तयारी नाहीं. हा चंद्या त्याचाच भाऊ; पण तो नुक्ता कुठं माणसाळतो आहे. अरे कुणीतरी मनावर घ्या आणि यांना माणसांत आणून सोडण्याचं तेवढं श्रेय संपादन करा.

**शिरीन :** त्यांचं शिकण्याचं अजून वय तरी आहे; आजच कांहीं निराश व्हायला नको. पण आमचे बाबा आज २०।२१ वर्षं प्रोफेसर आहेत, विद्यार्थ्यांना Philosophy शिकवतात पण प्लेटो पायथॅगॉरस पलीकडे जगांत सध्यां काय चाललं आहे त्याचा त्यांनीं केव्हांही विचार केलेला नाहीं. सुट्टीच्या दिवसांत घरीं असले कीं देवपूजेला त्यांना पक्का दीडतास लागतो. इतकंच काय पण आजोबांच्या श्राद्धाला मुद्दाम रजा घेऊन ते घरीं येऊन त्यांना सद्गति देतात. तेव्हां आतां काय म्हणावं—

**शशिकांत :** बरी आठवण केलीस. हा चंदू आपल्याला Rationalist म्हणवतो ना रे? पण गेल्या परीक्षेच्या वेळीं माझं लक्ष नाहींसं समजून गपचूप ट्राममधून दोन देवळांकडे नमस्कार केला बेट्यानं. त्यावेळीं ओशाळेल म्हणून बोललों नाहीं. नापास व्हायचा तो झालाच शेवटीं. (चंदू ओशाळतो.)

**चंदू** : अरे जरी माझीं मतं सुधारलीं तरी पूर्वीचं जन्मापासूनचं आमच्यावरलं influence अझून साफ गेलेलं नाहीं. आस्ते आस्ते जाणार. हाडींमासीं तें इतकं खिळून राहिलं आहे कीं देवळासमोर आल्याबरोबर अगदीं unconsciously हात जोडले जातातच.

**शिरीन** : तेवढं मलासुद्धां कबूल केलं पाहिजे. मनांतून हे superstitious beliefs काढून टाकण्याचा किती जरी प्रयत्न केला तरी केव्हां केव्हां बाहेर पडतांना शिंक झाली तर मनांत चर्र होतंच. असं वाटतं कीं ही शिंक नेमकी याच वेळेला कां व्हावी. पण त्याच्यांत कांहीं अर्थ नसतो. आपल्याला तसं वाटतं याचं कारण आपल्याला जन्मापासून मिळालेलं वळण. अक्षर ओळख होऊन मूल शाळेच्या आवारांत शिरूं लागतं न लागतं तोंच त्याला ईश्वराचे अस्तित्वाची ओळख करून देण्यांत येते. हें सगळं दृश्य जग ईश्वरानं निर्माण केलं आहे अशीच त्याची समजूत करून द्यायचा यत्न चाललेला असतो. तेव्हां कोंवळेपणीं या तालमींत तयार झालेलें मन मोठेपणीं आपल्यावरचं दडपण एकदम फेंकून देऊं शकत नसल्यास नवल कोणतं? जिज्ञासातृप्ति करण्याइतकी अक्कल अगर तितकं ज्ञान अंगीं नसल्यामुळं केवळ वेळ मारून नेण्यासाठीं म्हणून आईबापांनीं पुढं केलेलं हें ईश्वराचे नांवाचें

बाळकडू त्यावेळीं आम्हां मुलांचे अंगांत इतकं भिनून जातं कीं, त्यावर उभारलेलं आमचं मन आणि आमची विद्वत्ता एकाच दिशेनें वाढत जातात. जगाच्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाची ओळख करून द्यायची असेल तर अगदीं लहान मुलापासून आपण सुरवात करायला हवी. नाहींतर (चंदूकडे बोट दाखवून) यांच्यासारखी स्थिति होते आणि विचार पुढं धांव घेतात व आचार मागं ओढीत असतात. आणि अशी ओढाताण झाल्या-मुळें आपण केवळ उपहासीचे विषय मात्र बनतों आणि त्यामुळं विचार कुणाला पटत नाहींत.

**नारेन** : अशी कांहींशी परिस्थिति आहे खरी. लोकांना आपले विचार पटत नाहींत असं नाहीं, पण पटलेले त्यांना कळत नाहींत आणि आवडतही नाहींत. तोंडानं मनुष्य नाहीं नाहीं म्हणत आहे तरी सुधारणेच्या दिशेनं त्याचं पाऊल पुढंच पडत आहे. पण तें समजून उमजून पडत नाहीं. तसं पडलं असतं तर तें जास्त व्यवस्थेशीर झालं असतं. शिवाय आज-कालच्या लोकांचं Misunderstanding जरी त्यांच्या Progress च्या आड येत नसलं तरी Progress फारच मंद चालला आहे. आम्ही इतकंच म्हणत आहोंत. कीं, निसर्गा-प्रत—(सगळे आ करून बघतात.) किंवा तुमच्या सोईसाठीं आपल्या उद्दिष्ट ठिकाणापर्यंत म्हणतों हवा तर—किंवा त्याहीपेक्षां स्पष्ट

करून सांगायचं म्हणजे मानवी पूर्णत्वाप्रत—पोंचायला दोन रस्ते आहेत. एक आहे ती सडक आहे पण ती फार लांबची असून शांततेनं अगर सुखासमाधानानं जातां येण्यासारखी नाहीं आणि मुक्कामाला पोंचेपर्यंत सुरक्षितपणाची खात्री देतां येणार नाहीं. आतां आमच्यामतें त्याच जागीं पोंचायला दुसरी एक पायवाट आहे. ती दुरून दिसायला फक्त बिकट दिसते पण अनुभव घेऊन पाहिला तर ती फारच सोईस्कर अशी आहे. शिवाय गर्दी नसल्यामुळं शांतपणानं सुरक्षित आणि थोड्या वेळांत जातां येईल अशी आहे. पण ती जर आम्ही लोकांना दाखविली तर त्यांना आवडत नाहीं. त्यांना मोठा रस्ता पाहिजे. कारण आजपर्यंत सगळे लोक त्याच रस्त्यानं गेलेले आहेत म्हणून हे जाणार. त्या लोकांची परिस्थिति कशी होती, शिवाय ते बिनधास्त जाऊन पोंचले कीं नाहीं त्याबद्दल कोणी विचार करीत नाहींत. ते गेले म्हणून हे जाणार हेंच यांचं Argument. आम्ही दुसरी वाट दाखवतों ती केवळ त्यांना धोक्यांत घालावयाचा आमचा बेत आहे अशी समजूत करून घेऊन ते आपल्याला समाजद्रोही म्हणून नाना तऱ्हेचे आरोप आपल्यावर करतात; पण विचार कसला तो करीत नाहींत.

कुमार : Hear! Hear! नोरेन, किती सुंदर बोललास तूं! आज सुधारणेचा पाहिला धडा आपल्यापासून सुरू झालेला

दिसतो. भरलेल्या बैठकींत विशेषतः शिरीन व ( अचलकडे बोट दाखवून ) यांच्यासारखीं माणसं समोर असतांना खालीं मान घालून बसायचं सोडून आज केवढं धैर्य दाखवलंस हें ?

**चंदु :** कुमार, Be serious.

**कुमार :** Serious बीरीअस कांहीं नाहीं. मी आज बेफाम खुष झालों आहे. तेव्हां आतां वादविवाद बंद करून कोणी तरी थोडं गाऊन दाखवावं अशी मी सूचना करतों.

**रमण :** ( उठून ) माझं तिला अनुमोदन आहे.

**शिरीन :** ( उठून ) मीहि त्याला दुजोरा देतें.

**शशिकांत :** मी बसतों पेटीवर. चंदू, कसलीतरी गोडशी चीज म्हण. नाट्की पद मात्र नको हो. Come on.

**कुमार :** खांसाहेब, लहर लागू द्या एकदांची.

**नोरेन :** कुमार, रमण, सगळ्यांना सांगून ठेवतों त्याला गातांना nervous करूं नका. ऐकायचं असेल तर थंडपणानं ऐकून घ्या. नाहींतर बाहेर गॅलरींत जाऊन बसा. [ शशिकान्त पेटीचा सूर धरतो; कुमार, रमण व अचल स्वस्थ बसतात. शिरीन राहिलेला चहा नोरेनच्या व आपल्या कपांत थोडा थोडा ओततें. तीं दोघें चहा पितात. चंदु घसा साफ करून गाऊं लागतो. मधून मधून मंडळींचे वाहवा खांसाहेब वगैरे उद्गार चालत असतात. नोरेन व अचल संधि साधून एकमेकांकडे पहातात.

दोघांची नजर एक होतांच माना खालीं घालतात. चंदु एक पद म्हणून थांबतो. नंतर मंडळी शशिकान्तला आग्रह करतात. तो गातो. ]

**शशिकान्त :** आतां पुरे. माझा आवाज मनासारखा नाहीं.

**रमण :** छान करमणूक झाली. मनाला जरा मोकळं वाटलं.

**कुमार :** आम्ही तरी तेंच म्हणत आहोंत. काव्य पाहिजे तें फक्त करमणुकीसाठीं. प्रेमकथा कळायला नको कीं समाज सुधारायलाही नको. हा नोरेन पूर्वी फार बोलत असे कीं There should be nothing poetic in life or literature. पण सध्यां बेटा गायला शिकत आहे !

**रमण :** काव्य आणि music यांचा घोटाळा करूं नकोस. आज मोहन इथं असता कीं नाहीं म्हणजे त्यानं तुला व्यवस्थेशीर खेंचला असता.

**कमार :** खरंच, आज मोहनची स्वारी अचानक कुठं गडप झाली—

**नोरेन :** गेला असेल कुठं तरी. तुमच्यासारखा तो निरुद्योगी नाहीं—

**रमण :** समजलं हा त्याच्यावर पांघरूण घालतो आहे. [ बाकीच्यांकडे वळून ] मी सांगतों खात्रीनं मोहन आज घोडे उडवायला गेलेला आहे. आणि नोरेन त्याचा भागीदार

आहे. उगीच नाहीं तो विषय टाळीत.

**नोरेन** : बरं झालं गेला तर. शशिकान्त आणखी कुणी तरी गा पाहूं. [ तो उत्सुकतेनें अचलकडे पाहातो. शशिकांत त्याचा अर्थ समजतो. ]

**शशिकान्त** : कोण गातो ? ( अचलकडे वळून ) ताई, तूं गातोस ? (ती नाहीं म्हणते.)

**शिरीन** : अचल, ऊठ धीट हो जरा. ( बाकीच्यांना उद्देशून) होय ती गाते आहे. अचल, जा पेटीवर बैस.

**रमण** : नोरेन, तूं बैस ना पेटीवर. (हें बोलून तो कुमार-कडे वळून डोळे मिचकावतो.)

**शशिकान्त** : नोरेन, बैस पेटीवर.

[ नोरेन बसतो. अचल एक साधं पद म्हणते. त्यांच्याकडे पाहून चंदु, रमण आणि कुमार यांचीं तारायंत्रें सुरू असतात. अचल कसंबसं पद संपवते व ओशाळून खालीं मान घालून लाजून बसते. शिरीन कपबशा रचून एकावर एक ठेवते. मंडळी हलुहळू उठतात. ]

## अंक पहिला समाप्त.

# अंक दुसरा.

[ तोच दिवाणखाना, तेंच फर्निचर, तोच अव्यवस्थितपणा. वेळ:—रविवार संध्याकाळ, सुमारें सहा वाजतां, भिंतीवरील कॅलेंडरावरून पहिल्या अंकांतील गोष्टीला तीन महिने होऊन गेल्याचें स्पष्ट दिसत आहे. देवीदास आरामखुर्चीवर पडले आहेत. तोंडांत चिरूट आहे. हातांत एक English Magazine आहे. शांताबाई येऊन पलीकडील खुर्चीच्या आर्मवर टेकून बसतात. कांहीं वेळ देवीदास तिकडे लक्ष देत नाहींत. नंतर पुस्तक मांडीवर ठेवतात व चिरूट हातांत धरून– ]

**देवी :** काय ? तुला आज सैंपाक खोली सोडून इथं दिवाणखान्यांत येऊन बसायला फुरसत कशी मिळाली ?

**शांताबाई :** मला घरांत काम आहे पण आलें होतें मुद्दाम कांहीं विचारण्यासाठीं आपल्याला. शशिकान्त म्हणतो आहे इंग्लंडला जाणार. नोरेन जातोच आहे. त्याच्याबरोबर जाऊन आपण थोडे महिने काढून येतों.—

**देवी :** अग, Journalism शिकायला जाण्यासारखे आजचे दिवस नाहींत. कारण मग शिकून आल्यावर पुढं काय करणार इथं ? यांचीं सुधारक वर्तमानपत्रं इकडे चालणं शक्य नाहीं. तेव्हां तिकडून शिकून येऊन इकडे मग एखाद्या वर्तमानपत्राच्या ऑफिसमध्यें तारांचीं भाषांतरं करून चरितार्थ चालवायचा असेल तर हरकत नाहीं. त्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. बरं बॅरिस्टर होण्यासाठीं पाठवावा तर आपली सांपत्तिक स्थिति कशी काय आहे तें तुला दिसतंच आहे. मला कांहीं समजत नाहीं असं तुला वाटतं ? त्यांच्यासारख्या विचारांच्या माणसांनीं जरूर तिकडे जाऊन यावं असं माझं मत आहे, कारण त्यांना उत्तेजन द्यायला हवींत तशीं माणसं आपल्याकडे नाहींत. वाङ्मयावर पैसा मिळवायचे दिवस आपल्या देशाला अझून आलेले नाहींत. बरं नाहीं असंही म्हणतां येत नाहीं. कारण समंजस आणि सुसंस्कृत मनुष्याच्या दृष्टीनं कवडीकिंमत होणार नाहीं असं वाङ्मय तयार करून त्यावर शेंकडों रुपये मिळवितांना आपल्याला दिसताहेत लोक.

**शांता :** पण मला आपलं वाटतं हो. तसं कांहीं तरी लिहून पैसा मिळवायला काय झालं ?

**देवी :** काय झालं ? हें बघ तुझ्या समजुतीसाठीं तुझ्याच मनाचं एक साधं व्यावहारिक उदाहरण घेऊन सांगतों. आज एखादी वेश्या उजळमाथ्यानं हजारों रुपये मिळवते तुला माहीत आहे तर मग माझ्यासारख्या मध्यम स्थितींतल्या मनुष्याशीं लग्न करून ही चोवीस तास सैंपाकघरांत बसून राहाण्याची दगदग तूं कां पत्करलीस ? (ती कांहीं बोलण्याचा यत्न करते पण बोलत नाहीं.) वाङ्मयाचं अगदीं असंच आहे. पैसा मिळेल, नाहीं असं नाहीं. इतकंच काय, पण दोनतीन वर्षांच्या आंत इंग्लंडला जाऊन येण्याइतकं देखील शशिकांतला मिळवितां येईल. पण त्याची तशी इच्छा नाहीं आणि जरी असती तरी माझ्या मुलानं अशा रीतीनं लोकांच्यापुढं येऊन चालत्या जगाची आणि तीही विपरीत अशी नक्कल करून लोकांना एक प्रकारं फसवून पैसा मिळवावा हें योग्य वाटलं नसतं आणि मला त्यानं विचारलं असतं तर तसं करण्याबद्दल मी त्यास केव्हांही सल्ला दिला नसता. पण त्याच्या इच्छेआड मी होऊन मात्र कधींच गेलों नसतों. मुलांबद्दल मला किती अभिमान वाटतो त्याची तुला कल्पना होणार नाहीं.—

**शांताबाई :** आणि मला कांहींच वाटत नाहीं वाटतं ?

**देवीदास :** तुला वाटत असेलही. पण तुझ्या वर्तनानं त्यांना तूं उत्तेजन देत नाहींस. आज हजारों ग्रॅज्युएट्स् युनिव्हर्सिटीच्या चरकांतून बाहेर निघालेले आपण पाहातों, पण एकाला कांहीं ज्ञान म्हणून झालं असेल तर शपथ. शेंकड्यांतून एखादा कुणीतरी नोरेन अगर शशिकांत यांच्यासारखा निपजतो. मी म्हणतों नुसतीं भाराभर पुस्तकं वाचण्याची कांहीं गरज नाहीं. एक पुस्तक वाचून फक्त त्यावर भरपूर विचार करायला लावावं मुलांना. आपल्याकडे शिक्षणांत जर कोणती चूक असेल तर ती हीच कीं त्यामुळं विचार करायला कोणी शिकत नाहीं.

**शांताबाई :** विचार करायला शिकवलं पाहिजे—

**देवीदास :** आणि शिकलं पाहिजे हें मुख्य. तूं पुष्कळ शिकवशील पण शिकणारानं शिकायचं मनावर घेतलं पाहिजे. हेंच पहा आतां तुझी ही अचल आहे—

**शांताबाई :** आपली नाहीं वाटतं—

**देवीदास :** बरं, आपली ही अचल आहे; तिला तुझ्या काय किंवा माझ्या म्हण हवं तर मनांत असं येतं कीं पुष्कळ शिकवावी, पण ती आज चार वर्षं इंटर पास व्हायला तयार नाहीं, तिथं तूं आणि मी काय करणार? बरं नापास होते आहे तितकं तुला जास्त सुख होतं आहे. न जाणो कदाचित् जास्त शिकून मग

स्वतंत्र व्हायची आणि आपल्या सत्तेबाहेर जायची असं तुला वाटतं—

**शांताबाई :** होय बरं ! ती नापास व्हावी असंच मला वाटतं. ( हें वाक्य बोलून ती उपरोधिक नजरेनं नवऱ्याकडे पाहाते. )

**देवीदास :** अग नापास व्हावी असं जरी तुला वाटलं नाहीं तरी नापास झाल्याबद्दल वाईट कांहीं वाटत नाहीं. बाहेरून मात्र सांगतेस कीं, ती घरांत बसून राहाते. फिरायला जात नाहीं वगैरे. पण आंतून तुला तें मनापासून आवडतं. मुलं तुझ्या ताब्यांत राहावीं—

**शांताबाई :** राहिलींच पाहिजेत. माझ्या घरांत वाटेल तसं वागायला मी कुणालाच देणार नाहीं. मला तसं मुळींच सहन होत नाहीं.

**देवीदास :** हें बोलणं मला उद्देशून आहे वाटतं ?

**शांताबाई :** मला माहीत नाहीं. ( थोडावेळ थांबून ) हें पहा मला आतां तत्त्वज्ञान नको आहे. त्या अचलला नेऊन डॉक्टरला दाखवा. पोर अलीकडे धड जेवतखात नाहीं. फिकट फिकट होत चालली आहे. कशावर लक्ष नाहीं.

**देवीदास :** त्याला कारण तूं. तूंच कदाचित तिला थोडं वाढीत असशील नाहीं तर सगळा दिवस टोंचून बोलत अस-

शील. तुझा नेम सांगतां येत नाहीं.

**शांताबाई** : ( पूर्वीच्याच आवाजांत ) हो मला मुलं नकोचशीं झालीं आहेत.

**देवीदास** : झालं. लागली तिरसटासारखं करायला. अग मुलं नकोशीं कां होणार ? पण त्यांच्यावर सत्ता गाजवायला मिळाली पाहिजे असं तुझं म्हणणं. मुलं वयांत आल्यावर आतां त्यांच्यावर तुझा किंवा माझा अधिकार राहिला नाहीं. हीं दोन पोरं आतां स्वतंत्र झालीं. बाकी लहानांवर तुझी वाटेल तशी सत्ता चालव. आज अचलचं वय कांहींतरी तेवीस वर्षं होईल. तिचं लग्न करायचा तूं विचार करीत आहेस. कुणाबरोबर लग्न करणार तिचं ? आणि तिच्या लग्नाची आधीं वाटाघाट करण्याचा तुला काय हक्क ? तिचं ती पाहून घेईल. लग्न करावंसं वाटलं, करील; नाहींतर अविवाहित राहील. वाटेल तें जरी केलं तरी तुझा त्याच्यांत कांहीं संबंध पोंचत नाहीं. तुला आपलींशीं वाटतात तर त्यांनां तुझ्या घरीं ठेव. नीट जेवणखाण घाल, कपडालत्ता दे व चांगल्या रीतीनं त्यांना राहतां येईल असं कर. यापलीकडे एक शब्द पुन्हां काढूं नकोस. तुला वाटतं मीही तुझ्या लहरीप्रमाणं नाचायला हवं.

**शांताबाई** : पण त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं तर लोक आपल्याला काय म्हणतील ?

देवीदास : लोक तुझं घर पोशीत नाहींत आज कीं तें उद्यां बंद करतील म्हणावं! मूल वयाची एक ठराविक मर्यादा उलटून गेलं कीं तें स्वतंत्रपणें जगाचं एक घटक बनतं समजलं? आज अचल किंवा शशिकान्त यांना स्वतःच्या जिवाचं पोषण करण्याची ताकद आली असूनसुद्धां आपल्याकडे राहिलींत हा त्यांचा चांगुलपणा. उद्यां जावंसं वाटलं तरी त्यांना पूर्ण मोकळीक आहेच. तुला आतां या वयांत शिकवून तयार करणं शक्य नाहीं. तेव्हां काय होईल तें मुकाट्यानं बघून तूं स्वस्थ राहून दिवस काढले पाहिजेस. आतां हें तुला आवडत असेल तर मग प्रश्नच उरला नाहीं.

शांताबाई : (थंड होते. बोलण्याचा आवेश गिळून टाकते.) तें सगळं बाजूला ठेवा. आधीं त्या पोरीला काय होतं आहे तें पहा. मला हें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. तुम्ही तर अगदीं—(बाहेर घंटा वाजते. अचल आंत येते. वर वर्णन केल्याप्रमाणं ती दिसते.)

अचल : बाबा, बाहेर कुणी आले आहेत. गॅलरींत खुर्चीवर बसायला सांगितलं.

देवीदास : बरं केलंस. [ते बाहेर जातात. अचल तेथेंच उभी राहते. आईच्या तोंडाकडे पाहाते. आई कपाळाला आंठ्या घालून अचलच्या तोंडाकडे एकसारखी पाहाते. अचल खालीं मान घालते व हळूहळू तेथून पाय काढते.]

**शांताबाई** : ( अधिकारी शब्दांत ) अचल, इकडे ये. थोड्या वेळानं त्यांना बरोबर घेऊन डॉक्टरकडे जा. नाहींतर मी डॉक्टरनां इथं यायला निरोप पाठविणार.

[ अचल एकदम चमकते; पण कृत्रिम निर्विकारपणा चेहऱ्यावर आणण्याचा प्रयत्न करते. ]

**अचल** : आई, तुला वेड तर नाहीं लागलं ! मला काय होत आहे ? डॉक्टर येऊन काय करणार ?

**शांताबाई** : तुझ्या जिवाला बरं वाटत नाहीं.

**अचल** : माझ्या जिवाला काय होतें आहे तें तुला अधिक माहीत कीं मला ? हल्लीं हें एक काय भलतंच डोक्यांत घेतलं आहेस ? मला काय होत आहे ? कांहीं होत नाहीं. आणि डॉक्टर काय सांगणार ? तशी आजारी असत्यें तर आपली शिरीन आतां जवळ जवळ डॉक्टर झालीच आहे तिला नाहीं का कळलं असतं ?

**शांताबाई** : अचल, तूं कांहीं सांगून जरी माझी समजूत केलीस तरी मला आपलं दिसतं तें तुला सांगितलं. तूं मुद्दाम हट्टानं जर काय आजारीपणा लपवशील तर पोरी, पुढं जड जाईल.

**अचल** : येऊन जाऊन काय कीं मरायला होईल असंच ना ! आनंद आहे. तसं केव्हां एकदां होईल याची मी वाटच पाहातें आहें--

**शांताबाई :** काय फटकळपणानं बोलते आहे पण पोर ! तुम्हांला मजा वाटते पण आमचे प्राण--तुम्हांला सांगून काय उपयोग ? सगळीं पण कशीं एका वळणाचीं पोरं !

**अचल :** तूं आधीं तिकडे लक्ष देतेस कशाला ?

**शांताबाई :** लक्ष देऊं नको तर काय ? ही अशी तूं दिवसेन्‌दिवस पांढरी फिकट होत चालली आहेस हें डोळे उघडे ठेवून पहात बसूं ? जेवणाखाणाची इच्छा नाहीं. आमच्यासारख्यांना तसं झालं असतं तर एक त्यांत आश्चर्य वाटलं नसतं. पण तूं कोंवळी पोर. लग्नकार्य सगळं कांहीं व्हायचं आहे आणि हीं कांहीं लक्षणं बरीं नाहींत. तुला बारीक ताप वगैरे येतो का ?

**अचल :** आई, कपाळ फोडतें आतां पुढ्यांत तुझ्या. तूं घरांत जा बघूं. (शांताबाई आंत जातात व जातांना अचल-कडे एकवार भेदक संशयी मुद्रेनें पाहातात. त्या गेल्यावर अचल खिळल्यासारखी तेथेंच उभी राहाते. नंतर पलीकडे एका कोचावर अंग टाकून दोन हातांनीं तोंड झांकून घेते व अस्पष्ट हुंदके देते. शिरीन येते. )

**शिरीन :** अचल..................

[ खोलींत भयानक शांतता पसरते. घड्याळाची टकटक फार जोरांत ऐकूं येते. अचल ओ देत नाहीं. शिरीन पुन्हां

हाक मारते. तिच्या हांकेचे प्रतिध्वनि उठल्यासारखे वाटतात. शिरीन पुढें जाऊन कोचाजवळ उभी राहाते व अचलची मान वर करते. अचलच्या डोळ्यांतून पाणी येत आहे; गाला-वरील अश्रुबिंदु ती पदरानें टिपते व डोळे पुशीत शिरीनच्या तोंडाकडे पहाते. शिरीन कोचाच्या आर्मवर टेकते व अचळच्या गळ्याभोंवती हात घालून तिला जवळ ओढून घेते. ]

**शिरीन :** अचल, तूं इतक्या भित्र्या मनाची असशील असं मला वाटलं नव्हतं. ( अचल कांहीं तरी बोलण्याचा यत्न करते पण तोंडांतून शब्द निघत नाहींत. ) समजलं तूं काय काय सांगणार तें. आईला संशय आला आहे. आतां तसंच कांहींसं अस्पष्ट बडबडत ती गेली माझ्याजवळून. (अचल पुन्हा तिच्या अंगावर मान टाकते व तोंड झांकून घेते.) मला नोरेन आणि शशिकांत यांनीं सगळी हकिगत सांगितली. नोरेनला घेऊन शशिकान्त इतक्यांत इथं येईल. त्यानं तिकडे एक काय भलतंच वेड डोक्यांत घेतलं आहे. मला आश्चर्य वाटतं. तुम्ही दोघेंही अगदीं एकाच तऱ्हेचीं कशीं निपजलांत ! विचार इतके पुढं जाऊन सुद्धां काय हा तुमचा भित्रेपणा !

**अचल :** ताई, मी आतां काय करूं ? ( ती रडते. )

**शिरीन :** ( गंभीरपणाचा आव आणते. ) असा चार-चौघांत गवगवा होऊन माझ्या कानावर ह्या गोष्टी दुसऱ्याच्या

मार्फत येईपर्यंत तूं वाट कां पाहिलीस ? मी इथं होतें ना ? मग इतके दिवस माझ्यापासून हें तूं चोरून कां ठेवलंस ? मी कधीं आजपर्यंत कोणत्याच बाबतींत तुझ्याशीं प्रतारणा केली होती का ? मला योग्य वेळीं सांगितलं असतंस तर तुझ्यावर कदाचित् हा प्रसंग देखील आला नसता. मी तुला दोष दिला असता असं तुला वाटलं—

**अचल :** (तिला थांबवून) तसं नव्हे ग. पण मला सांगायला तोंडच नव्हतं. तुझं तसं नाहीं. तूं सगळ्या बाबतींत अगदीं धीट बनून गेली आहेस. पण खरं सांगूं ? माझी सदसद्विवेकबुद्धि त्यावेळीं नाहींशी झाली. परिणामाचा विचार माझ्या मनांत आला नाहीं. मला दोष देणार नाहीं ना तूं ? ताई, माझं आतां कसं होणार ?

**शिरीन :** मी तुला केव्हांही दोष देणार नाहीं. कोणताच विचारी आणि sensible मनुष्य तुला दोष देणार नाहीं. नोरेनचाही यांत अपराध नाहीं. या सगळ्या गोष्टीला निसर्ग जबाबदार आहे. ताई, Nature can't wait. पुढं कसं होणार त्याची काळजी करण्याचं कारण नाहीं. चांगली निढावलेली निर्लज्ज हो, आणि प्रामाणिकपणानं समाजाच्या पुढें ये. समाजाला ओळखत नाहींस तूं. तुला वाटतं तुझ्या बरोबरीचीं तुझ्या परिस्थितींतील इतर जगांतील माणसं सगळीं अगदीं

सॉवळीं असतील म्हणून ? केव्हांही शक्य नाहीं. पण समाजाला तें प्रामाणिकपणानं कबूल करायला नको. बरं हा अपराध आहे अशी जरी घटकाभर कल्पना केली तरी यांत जितका स्त्रियांचा अपराध असतो तितकाच पुरुषांचाही असतो. पण पुरुषांना निसर्गाच्या पक्षपातामुळं वाटेल तें करून नामानिराळं राहाण्याची सनद् मिळालेली आहे. बिचाऱ्या स्त्रियांच्या बाबतींत तसं नाहीं. त्यामुळं तुझ्यासारखाच जर एखाद्या मुलीवर असा उघड प्रसंग आला तर तेच पुरुष पुन्हा तिच्याकडे बोट दाखवून डोळे मिचकावयाला मागं पुढं पाहाणार नाहींत. अचल कोणत्या निमित्तानं का होईना, हा रूढ कल्पनांचा पडदा दूर करून—तसंही नको—साफ नाहींसा करून तूं तुझ्या खऱ्याखुऱ्या स्वरूपांत समाजाच्या रंगभूमीवर ये.

**अचल** : आईला, बाबांना काय वाटेल ?

**शिरीन** : तूं सज्ञान आहेस. आज तूं आईबापांची मुलगी नाहींस, भावंडांची बहीण नाहींस, कुणाची कोण नाहींस, तर या सबंध जगाचो तूं एक घटक आहेस. तूं स्वतंत्र आहेस. वेळ आली तर स्वतःच्या जिवाचं कसंही रक्षण करूं शकशील. अचल, तुला मुळींच भिण्याचं कारण नाहीं. आई, बाबा, आप्त इष्ट सगळयांनीं जरी तुला दूर केली तरी मीही तुझ्याबरोबर समाजांतून बाहेर पडून तुला जन्माची सोबत करीन हें लक्षांत ठेव. तुझे

बाबा इतक्या कच्च्या विचारांचे नाहींत. हें कळल्यावर त्यांच्या वयाला अनुसरून त्यांना जरा चमत्कारिक वाटणं साहजिक आहे, पण ते तुला कांहीं बोलणार नाहींत. शशिकांतला माहीत आहे, आणि त्यानेंच तुझी योग्य प्रकारें समजूत करायला मला सांगितलं. नोरेन तर स्वतःच्या जिवावरच उदार झाला आहे. मला त्याची दया आली—

**अचल** : ( उत्सुकतेनें ) काय म्हणाले तुला ?

**शिरिन** : तो आतां लवकरच इथं येईल तेव्हां त्यालाच विचार म्हणजे कळेल. दुसरं असं पहा, त्याला आतां तूं धीर दे नाहींतर तो आपल्या आयुष्याचं मातेरं करून घेईल. तुझ्याबद्दल जरी कुठं गवगवा झाला असला तरी त्यांत त्याचं नांव कुणीच घेत नाही. तेव्हां त्याला उजळ माथ्यानं जगांत वावरूं दे. त्यानं कांहींही सांगितलं तरी ऐकूं नकोस.

**अचल** : ताई, इतकी मी मूर्ख नाहीं. त्यांच्या नांवाला मी धक्का लागूं देणार नाहीं. त्यांच्याबद्दल मला केवढा आदर आहे तें तुला सांगून कळणार नाहीं.

**शिरीन** : मग हरकत नाहीं. नाहींतर आधींच तो nervous मनुष्य आहे आणि त्यावर तूं जर कांहीं कमीजास्त बोलशील तर तो काय करील याचा नेम नाहीं. त्याची शशिकान्त पाठराखण करतो आहे. त्याला आतां तूं सांभाळलं

पाहिजेस. मी जाऊन हलके हलकें तुझ्या आईच्या आणि बाबांच्या कानावर ही गोष्ट घालतें. नोरेन आणि तूं इथंच बसा. शशिकान्त आणि मी त्यांना तिथंच अडकवून ठेवतों. बोलतांना आज मुळींच संकोच धरूं नका. ( बाहेर गडबड ऐकूं येते, शशिकान्तचा आवाज. ) Just in time. नोरेन appointment ची वेळ कधीं चुकवणार नाहीं. अचल, मी जाऊं तर ?

**अचल :** थांब. त्यांना येऊं दे तरी. पण ताई मला भीति वाटते. माझ्यानं त्यांच्याशीं बोलवेल असं दिसत नाहीं. तूं रहा ना इथं.

**शिरीन :** हा वेडे ! मी इथं राहिलें तर नोरेन भिऊन जाईल. तुझ्या स्वाधीन आज आम्ही नोरेनला करीत आहों. तं समजुतदार आहेस. लाजाळू असलीस तरी Rationalist आहेस. मनाची समता मात्र ढळूं देऊं नकोस. आले इकडे ते. ( अचल उठते. शशिकान्त व नोरेन येतात. शशिकान्तनें पायांत तंग पायजमा व त्यावर खादीचा सदरा घातला आहे. केस मागें उलटे फिरवलेले आहेत. नोरेन साधं धोतर नेसला आहे. अंगांत open collar चा शर्ट व त्यावर कोट आहे. टोपी हातांत काढून घेतलेली आहे. केस विसकटलेले आहेत. कसलं तरी मॅगेझीन कीं वही टोपीबरोबर हातांत धरलेली आहे.

शशिकान्त त्याला खुर्चीवर बसायला सांगतो. तो हातांतील वस्तू खुर्चीवर टाकतो व कोटाचे खिशांत हात घालून उभा राहातो. शिरीन अचलच्या शेजारीं उभी असते, ती पुढं होते. शशिकांत अगदीं जणुं काय कांहीच झालं नाहीं अशा तऱ्हेचं चिन्ह तोंडावर आणण्याचा प्रयत्न करतो. अचल मधल्या टेबलाला टेंकून खालीं मान घालून उभी असते.)

**शशिकान्त :** (कृत्रिमतेनें) ताई, आज आपल्या शिरीन प्रमाणं तुलाही डॉक्टरीण बनवायचा माझा विचार आहे आणि तेंही परीक्षेला बसल्यावांचून हं. हा एक पेशंट घेऊन आलों आहें. त्याला तसा रोग कांहीं विशेष झालेला नाहीं. फक्त जरा डोकं फिरलं आहे आणि त्याला जर अगदीं मोकळा सोडला तर तो साफ निरुपयोगी होईल अशी भीति वाटत आहे. तेव्हां तूं त्याला कांहीं इलाज करून पहा. (नंतर तो स्वर बदलून अगदीं नाटकी अभिनयांत बोलतो.) हे अजाण तरुणा, केवळ मनःक्षोभामुळं आत्महत्येला प्रवृत्त झालेलं हें तुझं मन स्त्रीच्या नांवाला पूर्ण पात्र झालेल्या एका तरुणीच्या शब्दांनीं शांत करून आत्मपूर्ततेची जाणीव करून घे. (नाटकी अभिनयांतच तो एक पद गातो.)

**मोरन :** शशिकांत, माझी अशा रीतीनं शोभा करण्यासाठींच का मला आणलंस?

**शशिकान्त** : तुझी शोभा ? अरे तूंच तर आमच्या समाजाची शोभा आहेस. मघां जें मोठमोठं तत्त्वज्ञान सांगत होतास तें आतां स्वतां ताईलाच सांग आणि ती काय म्हणते तें पहा. आम्ही तिऱ्हाईत मधें कशाला ? शिरीन, चल चल. ( शिरीन जातांना अचलचा हात दाबून बाहेर जाते. शशिकांत दोघांकडे पाहात पाहात बाहेर जातो. दरवाज्याच्या बाहेर जाऊन पुन्हा फिरतो. )

**शशिकान्त** : ताई, बाबा, आई, सगळ्यांना मी तिकडेच गुंतवून ठेवतों अं. ( तो जातांना अचलला नोरेनकडे बोट दाखवून खुणावतो. नोरेनची पाठ असते. शशिकान्त दरवाजा अर्धा बंद करून जातो. अचल व नोरेन तशींच खिळल्यासारखीं उभीं राहातात. दोघेही आपापल्यापरी धीर करून बोलण्याचा यत्न करीतात. पण दोघांची नजरानजर झाली कीं, खालीं माना घालतात. अचल तोंडावर कृत्रिम स्मित आणते. व अगदीं शिरीनची इमिटेशन करून— )

**अचल** : (खुर्चीजवळ जाऊन) बसा ना इथं—( तो बसतो. लगतच्या खुर्चीवर अचल बसते. )

**नोरेन** : (थोडा वेळ स्तब्ध राहून) अचल, तूं माझं तोंड पुन्हां पाहशाल असं मला वाटलं नव्हतं.

**अचल** : तें कां ?

**नोरेन** : I have offended you. I have ruined your life—

**अचल** : असं कोण म्हणतं ? I am proud I have set the first lesson of social evolution.

**नोरेन** : अचल, हें केवळ माझ्या समजुतीसाठीं तूं म्हणत आहेस कीं मला दिणचून बोलत आहेस ?

**अचल** : नोरेन, मला जें कांहीं वाटतं तें मनापासून sincerely मी बोलत आहें. माझीं मतं तुम्हांला माहीत आहेत.

**नोरेन** : पण तीं नुसतीं मतं होतीं. आज पुष्कळ तरुण-तरुणींचीं मतं सुधारलेलीं आहेत पण आचाराच्या बाबतींत—

**अचल** : बरोबर आहे. कोणतीही गोष्ट हातून जोंपर्यंत एकदांतरी झाली नाहीं तोंपर्यंतच तिच्याबद्दल मोठा बाऊ वाटत असतो. एकदां कीं नाहीं त्या मर्यादेच्या बाहेर पाऊल पडलं कीं कांहींच वाटेनासं होतं. उलट समाधान होतं आणि अभिमान वाटूं लागतो. आपणच नाहीं का मागं एकदां बोलतां बोलतां बोलून गेलांत कीं मातृपद हाच स्त्रियांच्या जीवितपूर्ततेचा एक मोठा भाग आहे. म्हणून मी म्हणतें, लग्न केल्यावरच मातृपद प्राप्त करून घेतलं पाहिजे असा नियम कुणीं केला आहे ?

निसर्गांत तर तसा नियम नाहीं ना? झालं तर मग एकाद-दुसऱ्या व्यक्तीनं आपल्या तत्कालीन लहरीप्रमाणं आंखून दिलेला नियम posterityनं डोळे मिटून कां म्हणून पाळावा?

**नोरेन :** ज्यांना individuality म्हणून कांहीं नसेल अशाच लोकांनीं या निरर्थक गोष्टींचं स्तोम माजवलेलं आहे. आज आपण शिकलेल्या—नुसत्या शिकलेल्या नव्हे तर शिकून विचार करण्याची थोडी पात्रता अंगीं आलेल्या—माणसांनीं त्यांच्याविरुद्ध बंड उभारायला हवं.

**अचल :** आपण नास्तिक असं म्हणून समाज आपल्याला थारा देणार नाहीं.

**नोरेन :** नास्तिक व्हायला आस्तिक हा शब्दच मुळीं माझ्या कोशांत नाहीं. जिथं आस्तिकपणाचंच अस्तित्व मी नाकबूल करतों तिथं नास्तिकपणा येईल तरी कसा? दुसरं असं आहे कीं फार तर माझ्यासारख्या एकट्यादुकट्याला समाज इथून तिथून थारा देणार नाहीं. पण तीच आमची संख्या जर आस्ते वाढत गेली तर समाज मग तिकडे कानाडोळा करण्याचा प्रयत्न करणार. आज विवाहसंस्था नाहींशी करा म्हटलं तर कुणाला आवडत नाहीं; पण तुझ्यामाझ्यासारखीं उदाहरणं आज पडद्याआड कितीतरी असतील आणि कांहींच्यावर तर समाजानं जाणूनबुजून पडदा ओढलेला आहे. त्यांना मत आवडत नसलं

तरी त्यांची कृतीला संमती आहे; पण उघडपणं कबूल करायला मात्र नको. फक्त hypocrisy पाहिजे.

**अचल** : आम्हाला ते हींच विशेषणं लावतात.

**नोरेन** : बरोबरच आहे. पण मी म्हणतों आज आमच्यामतें hypocrite नाहीं असा एक तरी प्राणी तूं मला दाखवून देशील का? पण अलीकडे या शब्दांच्या व्याख्या इतक्या flexible झाल्या आहेत कीं majority जिकडे वळवील तसतसा त्यांचा अर्थ फिरत असतो.

**अचल** : आणि आम्हांला सुधारणावादी लोकांना ते hypocrite म्हणतात त्याला दुसरंही एक कारण आहे. कांहीं लोकांनीं आपला एक विवक्षित हेतू साधण्यासाठीं बऱ्याच वेळां ही सुधारणेची सबब पुढं केलेली आहे. त्यामुळं उद्यां जरी मी rationalist आहें असें सांगितलं तरी लोक म्हणणार कीं अविचारानं केलेल्या कर्मावर पांघरूण पडावं म्हणून शेपटी तुटलेल्या कोल्ह्यासारखं हें सुधारणेचं तत्व आम्ही लोकांपुढं मांडीत आहोंत. एकूण काय, कांहीं केलं तरी दोष टळत नाहीं.

**नोरेन** : तो दोष टळून अगर त्याचं समर्थन होऊन तुला उजळपणानं समाजांत फिरतां यावं यासाठीं मी एक उपाय शोधून काढला आहे. आणि त्याचसाठीं मी इथं

आलों आहें. तुझं पाऊल वांकडं पडायला मी जबाबदार असल्यानं तें पाऊल सुधारून पुन्हां वाटेवर आणण्याची जबाबदारी माझ्यावरच आहे. तेव्हां मी आतां सांगतों तो उपाय तुला कितपत रुचतो तें पहा.

**अचल** : कोणता तो ?

**नोरेन** : तूं माझ्याशीं लग्न करावंस अशी माझी इच्छा आहे. (अचल एकदम विस्मयित मुद्रेनें त्याच्याकडे पहाते. एखाद्या परीक्षेंत अनपेक्षित पेपर पुढं आल्यानं उमेदवाराची पहिलीं दोनतीन मिनिटं जी स्थिती होते तशीच कांहींशी अचलची स्थिती होते.) इतकी चकित कां झालीस तूं अचल ?

**अचल** : लग्न ! ( थोडा वेळ थांबून) लग्न कां म्हणून ?

**नोरेन** : म्हणजे सगळ्यांचीं तोंडं बंद होतील आणि जरी थोडबिहुत टीका झाली तरी तुझं जीवित वाऱ्यावर पडणार नाहीं.

**अचल** : नोरेन, तुम्ही मला Bernard Shaw ची Violet समजलांत कीं काय ? (नोरेन तिची नजर टाळण्याचा यत्न करतो.) नोरेन, मी भित्री असलें, लाजाळू असल्यें, तरी आज माझं मन मी तयार केलेलं आहे. या घटकेपर्यंत नाहीं म्हटलं तरी खरोखरच मला लोकांची भीति वाटत आहे. इतका विचार करून हेंच काय तुम्हीं ठरवलंत ? तुम्हांला विवाहसंस्था

संमत नव्हती ना ?

**नोरेन** . जरी नसली तरी माझं लग्न व्हायचं ठरलं आहे, तुला माहीत असेलच.

**अचल** : हो, माहीत आहे; पण त्याला कारण निराळं होतं. त्यांनीं आपल्या खर्चांत तुम्हाला बॅरिस्टर करण्यासाठीं पाठवाव-याचं ठरवलं होतं आणि त्यामुळं मतं बाजूला सारून तुम्हांला लग्नाला कबूल व्हावं लागलं.

**नोरेन** : कुठून तरी माझीं मतं बाजूला राहातातच ना ? मग त्या मुलीशीं लग्न करण्यापेक्षां तुझ्याबरोबर केलेलं अधिक चांगलं !

**अचल** : माझ्याशीं लग्न करून कोणत्याच रीतीनं तुमचा फायदा होणार नाहीं. Oscar Wilde म्हणतो तें अक्षरशः खरं आहे. आजच्या जगाचा परमेश्वर म्हणजे पैसा आहे. इंग्लं-डला जाण्याची संधि फार क्वचित् येते. इकडे राहिलांत तर तुमचं आर्थिक दृष्ट्या केवढं तरी नुकसान होईल. समाजांत दर्जा कमी होईल आणि सगळं आयुष्य पश्चात्तापांत काढण्याची पाळी येईल. आज माझ्या नांवानं जरी चहूंकडे बोलबाला झाला असला तरी तुमचं त्यांत कुणीही नांव घेत नाहीं. तेव्हां मुद्दाम दोष अंगावर घेऊन आयुष्याचं मातेरं करून घेऊं नका.

**नोरेन** : Engagement ठरली असली तरी मोडून

टाकतां येईल. पण तुला मी जर दूर केली तर तुझ्या अब्रूचे धिंडवडे निघतील आणि तुझं रक्षण करायला कुणी धांवणार नाहीं.

**अचल** : मी समाजांतून बाहेर पडलें तर माझं रक्षण करायला मी समर्थ आहें. तुम्ही जर माझ्याशीं लग्न केलंत तर दोघांचे हाल होतील; त्यापेक्षां माझं एकटीचं काय होईलं तें होऊं दे.

**नोरेन**: I cannot be so brutal. तुझ्याबरोबर लग्न करणं हें आज माझं कर्तव्य आहे. ( ती ओढून ताणून हंसते. )

**अचल** : नोरेन, तुमच्या कोशांत जसे कांहीं शब्द आढळत नाहींत, त्याचप्रमाणं माझ्याही कोशांत कर्तव्य, स्वार्थ-त्याग, आत्मत्याग, औदार्य असले शब्द आढळत नाहींत. या शब्दांना माझ्या मतें कांहींएक अर्थ नाहीं. ज्यांच्याजवळ शब्दभांडार भरपूर होतं त्यांनीं केव्हां केव्हां एक फॅशन म्हणून हे शब्द वापरायला सुरवात केली आणि आपल्या इतर धर्म-संस्कारांप्रमाणं हे शब्दसुद्धां रूढ होऊन बसले. कर्तव्याच्या अगर स्वार्थत्यागाच्या गोष्टी बोलणं म्हणजे निव्वळ hypocrisy आहे.

**नोरेन** : मला जें काय वाटतं तें करायला मी स्वतंत्र आहें.

**अचल :** मग स्वतांपुरतं तुम्ही वाटेल तें करा.

**नोरेन :** पण एक मित्र म्हणून तुला सांगतों—

**अचल :** पुन्हा तेंच. मित्रबित्र मी कांहीं ओळखीत नाहीं.

**नोरेन :** अचल, याच्यांत मी समजूं तरी काय ? आज तूं अशी बेफामपणानं काय बोलत आहेस ? आजपर्यंत तुला माझं बोलणं आवडत होतं—

**अचल :** आतां आवडत नाहीं. एकदां आवडलं म्हणून नेहमीं तें आवडावं असं थोडंच आहे.

**नोरेन :** अचल, तुझ्यापुढं आज जास्त बोलण्याची देखील मला भीति वाटूं लागली आहे. माझ्याबद्दलच्या तिरस्कारामुळं तर तूं असं बोलत नाहींस ना ? अचल, मी करूं तरी काय सांग.

**अचल :** ( तडफेनें ) मुकाट्यानं त्या मुलीशीं लग्न करून इंग्लंडला जा.

**नोरेन :** आणि तुला अशीच निराधार सोडून देऊं ? माझ्यानं तसं करवणार नाहीं.

**अचल :** मी जन्माला आल्यापासून मला तुमचा आधार होता जसा कांहीं.

**नोरेन :** पण आतां तुझ्या कुटुंबांतील माणसं तुझा छळ

करून तुला कदाचित् घालवूनही देतील.

**अचल :** मला नाहीं दिसत तसं करतील म्हणून. आणि कल्पना करा उद्यां मला हांकूनही दिली तरी कुणाचा आधार घ्यायचा कीं न घ्यायचा हा प्रश्न माझा आहे.

**नोरेन :** पण त्या सर्वाला मीच कारण आहें ना ?

**अचल :** असं कुठल्याही वर्तमानपत्रांतून अजून प्रसिद्ध झालेलं नाहीं. तुम्हीच कारण आहांत असं लोक कशावरून समजणार ?

**नोरेन :** लोकांच्या समजुतीसाठीं नव्हे, फक्त माझं मन मला सांगतं. अचल, माझी conscience मला सारखं टोंचीत असते कीं, मी एका उमलत्या जीवाचा सत्यानाश केला.

**अचल :** पण माझी conscience मला तसं सांगत नाहीं. तुमचाही दोष नाहीं, माझाही दोष नाहीं. दोष निसर्गाचा आहे. नोरेन, जगाच्या अज्ञान समजुतींचा फायदा घेऊन स्वतांचं कल्याण करून घ्या.

**नोरेन** तूं पुढं काय करणार ?

**अचल :** मला घरादारांतून बाहेर टाकली तर मी जिवाचं रक्षण करण्यासाठीं वाटेल तो धंदा करीन. इतकंच काय, पण एकाद्या कुंटीणखान्याचा आश्रय करायला मागंपुढं पाहाणार

नाहीं. आपल्या समाजाला त्याची फार आवड आहे हो ! तेथल्या स्त्रिया तिथं कशा आल्या त्याचं कोडं पुरुषवर्गाला केव्हांही उलगडत नाहीं.

**नोरेन :** किंवा उलगडून पहाण्याची तसदी घेत नाहीं. पण अचल, तुझ्या वर्तनानं तुझ्या आईला, बाबांना त्रास नाहीं का व्हायचा ?

**अचल :** त्याला इलाज नाहीं. हा आप्तसंबंध अगर नातीं-पातीं अजून कां ठेवलीं आहेत ? जन्माला येऊन एकाद्या अनाथाश्रमांत बेवारसी पोर म्हणून जर मी लहानाची मोठी झालें असतें तर माझ्या करणीची कुणालाही खंत वाटली नसती.

**नोरेन :** आज परिस्थिती अनुकूल नाहीं. उद्यां समाज-व्यवस्था जर पालटली तर अशी एक वेळ येईल कीं आईबाप, बहीणभाऊ, नवराबायको वगैरे सगळीं नातीं नाहींशीं होऊन फक्त स्त्री आणि पुरुष एवढाच भेद निसर्गांत राहील. प्रत्येक प्राणी स्वतंत्रपणें जगाचा घटक होईल. आणि कुणाच्या करणी-बद्दल कुणालाच दिक्कत वाटणार नाहीं.

**अचल :** आणि मूल जन्मलं कीं त्यावर कुणाचीच सत्ता नसून ती जगाची सर्वसाधारण मालमत्ता होईल. मग माझ्या-सारखा घरांत कोंडून राहाण्याचा प्रसंग कुणावरही येणार नाहीं.

**नोरेन :** तुझं हें बोलणं मला तंतोतंत पटत आहे. पण

हा निव्वळ Utopia आहे. तूं आजच्या जगांत आहेस हें विसरूं नकोस. आज जगांत जन्म काढायचा असेल तर जगाच्या सुराला सूर भिडवला पाहिजे.

**अचल :** नाहीं भिडवला तर काय होईल ?

**नोरेन :** ( भडकून ) तुझ्या पायांखालीं कपाळ फोडून जीव देईन. अचल, माझ्या अपराधाबद्दल रिव्हाल्व्हरनं पाहिजे तर माझा जीव घे, पण असं कठोर बोलून मला जास्त हिणवूं नकोस. आधींच चारी वाटेनं माझ्या मनाचा कोंडमारा झाला आहे. तुला समजुतीनं दोन शब्द सांगण्यासाठीं म्हणून आलों तों तूं माझी अशा तऱ्हेनें शोभा आरंभलीस ? तुला माझं सांगणं ऐकायचं नाहीं ? अचल, एका शब्दानं मला होय कीं नाहीं तेवढं कळूं दे. मग मी काय करायचं तें करीन.

**अचल :** मी नाहीं म्हटलं तर काय करणार तुम्हीं ? रागानं जाऊन जीव देणार ?

**नोरेन :** जीव दिला असता; पण तेवढं धाडस अंगांत नाहीं त्याला काय करणार ! म्हणून तर तुझ्याकडून असं बोलून घ्यावं लागलं—( तो जास्त nervous होत जातो. त्याला पाहून अचल घाबरते. आपण केलं काय आणि झालं काय भलतंच असं तिला वाटूं लागतं. )

**अचल :** ( काकुळतीच्या स्वरांत ) पण मी तुम्हांला दोष

देत नाहीं. [ नोरेन सद्गदित होतो. तो अगदीं रडण्याच्या बेतांत येतो. मघां बोलण्याचे भरांत तो मधल्या टेबलाला टेंकून उभा असतो तो पुन्हा येऊन खुर्चीवर बसतो, व दोन्हीं हातांनीं हातरुमाल तोंडावर धरून तोंड झांकून घेतो. अचल उठते व त्याच्या उजव्या हाताला खेटून उभी रहाते, व त्याच्या खुर्ची-च्या पाठीमागें एक हात धरून दुसऱ्या हातानें त्याचे केंस नीट करते. त्याची मान खालींच असते. ] मी तुमचं मन दुखवावं या उद्देशानं बोललें नाहीं. तुमचं मन घट्ट करण्यासाठींच मला तसं बोलावं लागलं. नोरेन, माझ्याकडे पहा. ( तो हळुहळू मान वर करतो व एकाद्या चुकलेल्या लहान मुलाप्रमाणें तिच्याकडे पहातो. ) माझं सगळं बोलणं कृत्रिम होतं. मी आजपर्यंत तुम्हांला कधीं उलट उत्तर दिलेलं आठवतं का ? तुमच्याबद्दल मला काय वाटतं तें सांगून कळणार नाहीं. ( डावा हात त्याच्या मानेवर ठेवून ती खुर्चीच्या उजव्या आर्मवर बसते. तिचा उजवा हात नोरेन आपल्या हातांत घेतो. ) नोरेन, मी तुमचीच आहें; पण तुमच्याबरोबर मला लग्न करतां येणार नाहीं. लग्न करून विशेष तें काय मिळणार ? नोरेन, ( थोडा वेळ थांबून ) मी तुम्हांला हवी आहें ना ?

**नोरेन** : लग्न कां नको ?

**अचल** : हा प्रश्न तुम्ही विचारलात याचं मला नवल वाटतं. नोरेन, माझ्या आयुष्याची जबाबदारी अंगिकारण्यासाठींच

ना तुम्ही माझ्याशीं लग्न करणार आहांत ? झालं तर ! लग्न केल्याशिवाय तें तुम्हांला करतां येईल. तुम्ही खुशाल ठरविलेल्या मुलीशीं लग्न करून इंग्लंडला जा. त्या लग्नामुळं तुम्हांला उद्यां आर्थिक टंचाई भासणार नाहीं आणि इंग्लंडहून आल्यावर तुम्हांला जर माझ्याबद्दल सहानुभूति उत्पन्न होऊन मला कसली मदत करावीशी वाटली तर मी तिचा मोठ्या आनंदानं स्वीकार करीन. आज आपणांस एकमेकांबद्दल जो आदर वाटत आहे तोच कायम राहिला म्हणजे झालं. तुम्हांला वाटतं लग्नाच्या बंधनानं आपला नेहमी विचारविनिमय होऊन आपण कायमचे याच स्थितींत राहूं म्हणून ? आज ना उद्यां केव्हां तरी जराशी incompatibility सुरू झाली कीं मग पश्चात्ताप करण्याची पाळी आणण्यापेक्षां आपण लग्नाचं बंधन जखडून न घेतलेलं फार बरं. नोरेन, माझं मघाचं बोलणं सगळं आपल्याला आतां नीट कळलं असेल.

**नोरेन** : अचल, स्वार्थत्याग नाहीं म्हणतां म्हणतां तूं हें काय करीत आहेस ?

**अचल** : मला ज्यामुळं सुख वाटेल अशी एक गोष्ट मी करीत आहे. यानं तुमचं कल्याण होत असेल, नाहीं असं नाहीं. पण माझं त्यामुळं जास्त कल्याण होणार आहे.

**नोरेन** : तें कसं काय ?

**अचल :** उद्यां मी एकाद्या अनाथाश्रमांत जाऊन आलें कीं मला पूर्ववत घरादारांत वावरतां येईल. मला घरांतून हांकून देणं शक्य नाहीं. पहिल्यानं थोडे दिवस त्रास होईल पण नंतर लोक तिकडे दुर्लक्ष करणार. माझ्याशीं लग्न करायला कुणी तयार होणार नाहीं आणि मला तेंच पाहिजे. माझा आतां ठाम निश्चय झाला आहे कीं लग्न करून मी माझं व्यक्तिस्वातंत्र्य केव्हांही गमावणार नाहीं. अशी राहीन. बरं कदाचित् आईबापांनीं समाजांत मला बहिष्कृत ठरवली तरी मला स्वतंत्रपणानं राहातां येईलच आणि तसं झालं तर तुम्हांला आपलेपणानं मला मदत करायची संधि मिळेल. तुमचं लग्न झाल्यावर तुम्हीं त्या स्थितींत माझ्याशीं उघड संबंध ठेवला तरी समाज तिकडे लक्ष देणार नाहीं. आणि अशीं उदाहरणं मी आज तुम्हांला कितीतरी दाखवीन.

**नोरेन :** अचल, तुला काय म्हणावं हेंच मला आतां कळेनासं झालं आहे.

**अचल :** नोरेन, मी याच्यांत मोठं दिव्य करीत आहें असं नाहीं. आजची स्त्रीजात आपलं स्वातंत्र्य नाहींसं करून घेऊन पुरुषांची करणी मुक्या मनानं डोळे उघडे ठेवून पहात आहे. यापुढं तरी तसं होऊं नये म्हणून आमचीं उदाहरणं पुढं ठेवून उद्यांच्या स्त्रीजातीला मी बंडाला प्रवृत्त करीत आहें.

**नोरेन :** पण स्त्रीला आपली स्वतांची जाणीव करून द्यायला आम्ही पुरुषच खरे कारणीभूत होत आहों हें तूं विसरतां नये.

**अचल :** पुरुषांनीं तेवढ्यानं हवं तर स्वतांचं समाधान करून घ्यावं.

**नोरेन :** शेवटीं मला काय सांगतेस तूं, अचल ?

**अचल :** कांहीं नाहीं. आपण पूर्वीं होतों, आतां आहोंत, तशींच यापुढंही राहाण्याचा प्रयत्न करूं. विचारविकार नाहींसे करून जर मी पूर्वींप्रमाणंच नैतिक नियम पाळून घरांत बसून राहिलें असतें तर कुणी सांगावं कदाचित् एकाद्या अपरिचित तरुणाबरोबर लग्न करण्याचा माझ्यावर प्रसंग आला असता. आणि परिस्थितीखालीं मान वांकवावी लागून मला माझं मीपण विसरून गुलामगिरींत उभा जन्म काढावा लागला असता. पण आतां माझ्याशीं उघडपणें लग्न करायला कोणी पुरुष उभा राहील असं वाटत नाहीं. त्यामुळं माझ्या स्वातंत्र्याला बाध आणण्यासारखं कांहीं माझ्या आईबापांच्या हातूनही होणं शक्य नाहीं.

**नोरेन :** अचल, मी जाऊं तर ? पण मला माझी लाज वाटते.

**अचल :** अगदीं निर्धास्त जा. मी केव्हांही तुमच्या

नांवाला डाग लागूं देणार नाहीं. नोरेन, मघां तुम्हांला मी फार टाकून बोललं त्याबद्दल मला क्षमा करा. माझ्याबद्दल भलताच ग्रह करून घेऊं नका. मात्र आधीं इंग्लंडला जा आणि मग येऊन तिच्याशीं लग्न करा. माझा तुम्हाला आशीर्वाद आहे.

**नोरेन :** अचल, केवढ्या पोक्तपणानं तूं बोलत आहेस !

**अचल :** तुम्ही पोरकटपणा आंणलात म्हणून मला पोक्त व्हावं लागलं.

**नोरेन :** अचल, माझ्यानं इतकीं वर्षं इंग्लंडांत राहावेल तरी कसं ? इथं तुझ्याशिवाय मला कितीतरी चुकल्यासारखं वाटतं—

**अचल :** हा सगळा भ्रम आहे. बोटींत पाय ठेवलात कीं पहिल्यानं थोडा वेळ तुम्हांला चमत्कारिक वाटेल, नाहीं असें नाहीं. पण नंतर सर्वकाळ तुम्ही माझ्यासाठीं झुरणीस लागाल असं मात्र नाहीं. इतर गोष्टींप्रमाणं हाही एक भ्रम मानव जातीनं स्वैर वाढू दिला आहे. पण व्यवहारांत तसं मुळींच आढळून येत नाहीं.

**नोरेन :** अचल, जातों मी. तूं सगळ्यांची समजूत घाल-शील ना ?

**अचल :** त्याचां तुम्ही काळजी करूं नका. [ नोरेन उठतो आणि गोंधळल्यासारखा उभा राहातो. अचल त्याच्या तोंडाकडे

पहाते. तिचे डोळे भरून येतात. नोरेन तिला जवळ ओढून तिच्या कपाळाचें चुंबन घेतो. नंतर ती त्याच्या खांद्यावर डोकें ठेवून थंड कांहीं वेळ उभी राहाते. नोरेन तिचा उजवा हात हातांत घेऊन त्याचं चुंबन घेतो. दरवाजा जोरानें लोटल्याचा आवाज होतो. शिरीन आंत येते. तीं हळूहळू दूर सरतात. अचल डोळे पुसते. ]

**शिरीन** : (पुढें होऊन) तुमचा तह झाला कीं नाहीं ! (तीं दोघें एकमेकांकडे पाहून हंसतात.) नोरेन, आमची अचल म्हणजे आम्हांला एक भूषण आहे.

**नोरेन** : शिरीन, मी जातों आतां. सगळी मंडळी इथं येतील त्यांच्यासमोर माझ्यानं उभं राहवणार नाहीं.

**शिरीन** : आतां तुम्हांला मी मुद्दाम राहाण्याचा आग्रह करणार नाहीं. तुमच्या डोक्यांतलीं अभ्रं दूर झालीं ना ! तेवढंच आम्हांला हवं होतं. नोरेन, आतां इकडे असेपर्यंत इथं येतजात राहिलं पाहिजे. अलीकडे बरेच दिवस इकडे फिरकलांत नाहीं तुम्ही अगदीं. (नोरेन जातो. अचल पूर्वीचा उसना तडफदारपणा टाकून देते व मटकन् कोचावर बसते.)

**शिरीन** : अचल, त्याला अगदीं मारून टाकलेला दिसतो.

**अचल** : ताई, मला त्यांच्यापाशीं कितीतरी कठोर व्हावं लागलं ! सगळी तालीम माझ्या हातून झेपते कीं नाहीं त्याची मला भीति वाटत होती. पण वेळ कशीबशी मारून न्यावी

लागली. ताई, त्यांचं मन किती कोवळं आहे म्हणून सांगू ?

**शिरीन :** असल्या sentimental माणसांना फार जपायला हवं—

**अचल :** बरं पण आईला, बाबांना तूं सांगितलंस ?

**शिरीन :** हो—

[ शिरीनचे शब्द तोंडांतच राहातात. शिरीनचे वडील प्रोफेसरसाहेब आंत येतात. चर्येवरून ते अगदीं दमून आलेले दिसतात. बाहेर बंधूशीं न बोलतां ते तडक आंत येतात. हातांतली बॅग खुर्चीवर टाकतात. व काठी तिथेंच ठेवतात. अचल उठून उभी राहाते. शिरीन त्यांच्याकडे आश्चर्यचकित होऊन पहाते. प्रोफेसरसाहेब वयानें सुमारें ५० च्या मानानें आहेत. केंस पांढरे झालेले आहेत. मिशा भरपूर आहेत. डोकीला पगडी आहे. अंगांत काळा लॉंगकोट व गळ्याभोंवती उपरणं आहे. चेहऱ्यावर पाणीदारपणा बिलकूल दिसत नाहीं. त्यांच्याकडे पाहतांच त्यांना जगांत काय चाललं आहे त्याची कांहींच शुद्धि नसावीशी वाटते. ]

**शिरीन :** बाबा, तुम्ही इकडे—

**प्रोफेसर :** ( अधिकारी शब्दांनीं ) शिरीन, मी तुला न्यायला आलों आहे.

**शिरीन :** म्हणजे ? याचा अर्थ काय बाबा ?

**प्रोफेसर :** अर्थ कसला ? I don't want you

to stay here any longer.

**शिरीन :** पण इथून मला तुम्ही कां नेणार ?

**प्रोफेसर :** तो प्रश्न माझा आहे.

**शिरीन :** नाहीं, तो प्रश्न माझ्या खुषीचा आहे. मला जिथं राहावंसं वाटेल तिथं मी राहीन. द्यायचा असेल तर मुकाट्यानं खर्च द्या.

**प्रोफेसर :** पण इथं नको.

**शिरीन :** कां नको ?

**प्रोफेसर :** सभ्य गृहस्थाच्या तुझ्यासारख्या अविवाहित मुलींना राहाण्यास ही जागा योग्य नाहीं.

**शिरीन :** अविवाहित मुलींना येथील हवा मानवत नाहीं असं तुमचं म्हणणं आहे ? मला तर येथील हवा फार चांगली मानवते, बाबा.

**प्रोफे० :** तसं नव्हे ग. मी म्हणतों कीं अविवाहित मुलींनीं यापुढं इथं राहाणं धोक्याचं होईल.

**शिरीन :** कां ? त्यांना प्लेग, कॉलरा वगैरे कांहीं होईल अशी—

**प्रोफे० :** (वरच्या आवाजांत) शिरीन, जास्त फाजील बोलूं नकोस. चल म्हटल्याबरोबर मुकाट्यानं चालायला लागावं.

**शिरीन :** मी इथून हालणार नाहीं.

**प्रोफे०** : ( भडकून ) माझी अमर्यादा करतेस पोरी--

**शिरीन** : पण तुम्हाला मर्यादा आहे कुठं ? तशी असती तर—

**प्रोफे०** : कारटे ! मी तुझा बाप आहें—

**शिरीन** : कारण मी तुम्हांला म्हणतें बाबा असंच कीं नाहीं ? दुसऱ्या एखाद्या नांवानं हाक मारली असती तर आपण माझ्यापेक्षां बरेच वयोवृद्ध असल्याकारणानं कानाला चमत्कारिक लागलं असतं म्हणून मी मोठ्या आदरपूर्वक रीतीनं "बाबा" म्हणून चारचौघांत तुम्हांला मान देतें.

**प्रोफे०** : ( संशयित आवाजांत ) मग मी तुझा बाप नव्हें तर—

**शिरीन** : मी आईबाप वगैरे कांहीं ओळखत नाहीं. फक्त स्त्री आणि पुरुष एवढीं दोनच नातीं मला निसर्गांत दिसतात.

**प्रोफे०** : बस्स कर हा पाचकळपणा ! कारटीला मन मानेल तसं वागूं दिलं, हवा तसा पैसा उधळायला दिला, त्याचा हा परिणाम !

**शिरीन** : तसं केल्याशिवाय तुम्हांला गत्यंतर नव्हतं. पैसा पाठवलात यांत विशेष तें काय केलंत ? निदान सज्ञान होईपर्यंत तरी मला जन्माला घातल्याबद्दल शिक्षा म्हणून तुमच्यापासून मी तो हक्कानं—कायदेशीर रीतीनं नव्हे बरं, तर

हक्कानं—घेतला असता. मुलं सज्ञान होईपर्यंत आम्ही त्यांना वाढवलं असं जर उद्यां तुमच्यासारखीं सगळीं आईबापं म्हणूं लागलीं तर तें गैर दिसेल; कारण त्यांनीं तें एक प्रकारें कर्तव्य अगर शिक्षा म्हणून केलंच पाहिजे. आईबाप घटकाभर जिवाची करमणूक करायला म्हणून जातात, पण त्याचा परिणाम पुढं काय होईल याकडे त्यावेळीं त्यांचं लक्ष नसतं. मला तुम्ही पैसा पाठविलात; मोठं औदार्य केलंत नाहीं का? हातोहात पैसा मोजून एकादी माडी चढून गेलां असतां कीं नाहीं तर तेथल्या मुलांना पोसण्याची जबाबदारी अंगावर पडली नसती. पण धार्मिक विधीनं अगदीं कायदेशीर रीतीनं लग्न करून हा जास्त सुखाचा मार्ग तुम्ही लोकांनीं शोधून काढला आहे. केल्या कर्मांचीं फळं भोगलीं पाहिजेत. तसल्याच एकाद्या सार्वजनिक ठिकाणीं, रात्रीला, तासाला, मिनिटाला वाटेल ते करारमदार कबूल करून तुम्ही खणखणीत पैसा मोजतां आणि हक्काची बायको म्हणजे अगदीं कस्पटासमान वाटते तुम्हां पुरुषांना! केल्या हुकमाची ताबेदारीण आणि मांडलेल्या जुलमाची victim अशी तुमच्या जगांत धर्मपत्नीची व्याख्या दिसते. बिचारीला दुसरा कोणताच मार्ग न उरल्यामुळं तोंड झांकून एकाद्या जनावराप्रमाणं तुम्हीं केलेलं वर्तन मुकाट्यानं सहन करून घ्यावं लागतं. तिच्या मुलांवर मात्र तुमची कडक सत्ता

चला, मी जास्त बोलत नाहीं. मी इथून कुठं जाणार नाहीं. एवढंच नव्हे तर उद्यां समाजानं अचलच्या अब्रूचे धिंडवडे काढले तर जिथं जिथं म्हणून ती जाईल तिथं तिथं मी तिची पाठराखी म्हणून जाईन समजलांत—[ शिरीनचें हें लेक्चर चालू असतांना प्रोफेसरसाहेब नेपोलियनसारखा पाठीमागें हात धरून इकडून तिकडे येरझारा घालीत फिरतात. मधून मधून तिच्यासमोर उभे राहून रागानें डोळे ताणून पाहातात. अचल भिऊन कोपऱ्यांत जाऊन खालीं मान घालून उभी राहते. ]

**प्रोफेसर :** टाळकीं फिरलीं कारट्यांचीं ! एकवीस वर्षं प्रोफेसरी केली, पण अझून असलं तत्त्वज्ञान मला कुणीं शिकवलं नव्हतं तेंच आज पोटच्या पोरीकडून शिकण्याचें नशिबानं आलं. ( कपाळावर हात मारून घेतात. ) एका कारटीनं दिवे लावले. नांव सुद्धां घेववत नाहीं पोरीचं. मागचा पुढचा विचार न करतां—( हा गडगडाट ऐकून देवीदास, शांताबाई व शशिकान्त दरवाज्यांत येतात व तेथेंच थबकतात. )

**शिरीन :** ( त्यांना अर्ध्यावरच थांबवून ) पुढं बोलूंच नका बाबा. जितके जास्त जास्त बोलत जाल तितकी जास्त शोभा करून घ्याल तुमची चार मंडळींत. अचलनं मागचा पुढचा विचार केला नाहीं असं तुम्हांला वाटतं ? काय हो, तुम्हांला आणि आईला आम्ही सात मुलं झालों. प्रत्येक मुलाला

जन्म देण्याचे आधीं तुम्हीं आणि आईनं कितीसा विचार केला होता ? बोलणं फार सोपं असतं. बाबा, अचलचं वय आज जवळ जवळ तेवीस वर्षं होईल. आमच्या आईला पहिलं मूल झालं तेव्हां आईचं वय कांहीं तरी पंधरा सोळा वर्षांचं होतं तुम्हांला माहीत आहे. त्या मानानं पाहूं गेलं तर अचलला चार मुलं झालीं असतीं तरी क्षम्य होतं. इतकं असून तुमच्यां सारखीं विद्वान माणसें तिला दोष देतात अं ! मी विचारतें, बाबा, आज अचलवर आलेला प्रसंग जर माझ्यावर आला असता तर तुम्ही काय केलं असतं ?

**प्रोफेसर** : ( घोटाळून कांहीं वेळानें अडखळत ) तुला —तुला मी घरांतून हांकून दिली असती—

**शिरीन** : ( ती उपरोधिक मुद्रेनें पहाते. ) अस्सं ! आणि बाबा, असं पहा, तुमच्या ऐन तारुण्याच्या भरांत अचलसारखंच एकाद्या अविवाहित मुलीचं पाऊल वांकडें पडलें असतं आणि त्याबद्दल तुम्ही—( प्रो. साहेब आ करून बघतात. ) बाबा, तुम्ही स्वतां जबाबदार असतां तर तुम्हीं त्या मुलीला कोणता सल्ला दिला असता ? ( प्रो. साहेब तोंड फिरवतात. ) तोंड कां फिरवलंत असं ? यावेळीं इथं तुमच्यासमोर तुमची मुलगी बोलत नसून त्या काल्पनिक मुलीचा बाप उभा आहे असं समजा. बोला, त्या मुलीची तुम्ही काय व्यवस्था केली असती ?

**प्रोफेसर :** ( आकाशाकडे पाहून थोडा वेळ विचार करून अगदीं गंभीरपणानं ) त्याला आम्ही जबाबदार नसून निसर्ग जबाबदार आहे.

**शिरीन :** मी तरी तेंच म्हणतें आहें. पण तुमच्या पुरुषांच्या बाबतींत जसा निसर्ग जबाबदार आहे तसा बिचाऱ्या अचलच्या बाबतींत नाहीं वाटतं ?

**प्रोफेसर :** पोरी, तूं मला तर्कशास्त्राचे पेंच शिकवायला नको. आज वीस वर्षें मी तेंच शिकवीत आहें.

**शिरीन :** तर मला न्यायला आलांत कशाला ?

**प्रोफेसर :** कांहीं असलं तरी तुला माझ्याबरोबर आलं पाहिजे. मी इथं क्षणभर राहाणार नाहीं.

**शिरीन :** तुम्ही नका राहूं इथं, पण मी येणार नाहीं.

**प्रोफेसर :** काय ? तूं येणार नाहींस ? बेशरम कारटी ! शिरीन, तुला बाहेर निघालं पाहिजे. नाहींतर खेंचून काढायला लावीन.

**शिरीन :** ( थंडपणानं हंसून ) बाबा, हें विसावं शतक चाललं आहे. आज मी वयांत आलेली सज्ञान मुलगी आहें. कायदा कांहीं करूं शकणार नाहीं.

**प्रोफेसर :** ( वैतागानं ) भीक मागायची असेल तर राहा इथंच. मी हा चाललों. यापुढं माझा तुझ्याशीं कसलाच संबंध

नाहीं. ( रागानें पाय आपटीत बॅग आणि काठी घेऊन जाऊं लागतात. )

**शांताबाई :** } (एकदम { असं काय उभ्याउभ्यानं जायचं तें !
**देवीदास :** } दोघेंहीं ) { दादा, असा चाललास काय एकदम !

**प्रोफेसर :** या नरकांत एक मिनिटभर थांबण्यास तयार नाहीं मी. ( दरवाजाबाहेर जाऊन पुन्हा विचार करीत आंत येतात. )

**प्रोफेसर :** शिरीन, तूं आतां कॉलेज सोडणार कीं काय ?

**शिरीन :** तूर्त तसंच करावं लागणार.

**प्रोफे :** चार महिन्यांवर परीक्षा आली आणि तूं कॉलेज सोडणार !

**शिरीन :** दुसरा इलाज नाहीं. आज स्वतः पैसा मिळवून कोर्स पुरा करतां येईल असं वाटत नाहीं. कुणाकडे मी मागणं शक्य नाहीं.

**प्रोफे :** समज, मी तुला पैसा दिला तर--

**शिरीन :** तुम्ही माझा संबंध तोडून टाकला होता ना ?

**प्रोफे :** हो पण एकाद्या बेवारसी अनाथ पोराला नाहीं का आपण मदत करीत ? तशीच मी तुला चार महिने पैशाची मदत करीन.

**शिरीन** : मी तुमची आभारी होईन. मग मला कॉलेज सोडण्याचं काय कारण ?

**प्रोफेसर** : बरं तर जातों मी.( ते निघून जातात. )

**देवीदास** : शिरीन, काय केलंस हें ! ( ती हंसते. )

**शशिकान्त** : योग्य तेंच केलं तिनें. काकांचं हें वर्तन तुम्हांला आवडलं बाबा ?

**देवीदास** : पण या वेळेला घरांतून तो जेवल्याशिवाय बाहेर निघून गेला, तेव्हां लोक आपल्याला काय म्हणतील ?

**शशिकान्त** : कांहीं म्हणणार नाहींत. निदान आज तरी अशी वेळ आली आहे कीं लोकांकडे आपल्याला मुद्दाम डोळे-झांक करायला हवी.

[देवीदास कपाळावर हात घेऊन स्वस्थ खुर्चीवर बसतात. शांताबाई पुढें येतात. ]

**शांताबाई** : [ कोपऱ्यांत भिऊन अर्धमेल्या झालेल्या अचलकडे पाहून ] अग कारटे ! भित्री लाजाळू भिडस्त म्हणतां म्हणतां चांगलं काळं फांसलंस तोंडाला आमच्या. याचसाठीं लग्न नको म्हणत होतीस वाटतं ? हा पोर नाहीं नाहीं ते ढंग करून निरुद्योगी पोरं जमवतो इकडे आणि घालतात हवा तसा हैदोस घरांत. मुख्य मालकाचीच जर तुम्हांला फूस तर माझें काय ऐकणार तुम्ही ? जा म्हणावं आतां चारचौघांत

उजळ तोंडानं फिरा कसे फिरतां ते ! असे दिवे लावायचे होते तर चांडाळणी, मेलीस कां नाहीं त्यापेक्षां ! तरी मला संशय साधारण आलाच होता दुपारची मलूल दिसायला लागली तेंव्हां—

**देवीदास :** ( तिला थांबवून ) बस्स कर. आतां माहीत आहे तूं काय शिस्त लावणार ती.

**शांताबाई :** असं करून तुम्हीच पोरांना चढवून ठेवलं आहे. माणसांतून उठण्याची वेळ आणली चांडाळणीनं. काय साळसूदपणानं मला शिकवत होती पण ! देवा ! देवा ! ! हें बघण्यापेक्षां जीव दिलेला काय वाईट ! बिचारे भावोजी आले धांवून—

**देवीदास :** ( चिडतात व उठून मागेंपुढें येरझारा घालीत बोलतात. ) तो एक गेला डोक्यांत राख घालून तसं तुलाही जायचं असेल तर चालती हो येथून. जीव द्यायचा असेल तर शशिकान्त हिला अपोलो बंदरवर नेऊन पोंचीव. नाहींतर इथंच मरायचं आहे तर शिरीन दे तिला अर्सेनिकचा डोस आणून. तुझ्यासारखीं एकदोन माणसं नाहींशीं झालीं तर जग आज बुडत नाहीं. काय शिंचा त्रास आहे—

[ शांताबाई थंड होतात. डोळ्यांला पदर लावतात. थोडा वेळ कुणिच बोलत नाहीं. देवीदास शांत होतात. बसतात. ]

**शिरीन :** काकी, अचलचा अपराध आहे असं तुम्हांला

वाटतं ? उलट तुम्हांला तिची दया आली पाहिजे. या वयांत तिनं संन्यासी वृत्तीनं राहावं असं तुमचं म्हणणं ? काका, तुम्ही करा हिची समजूत.

**देवीदास :** शांता, त्या पोरीशीं आधीं नीट बोल. नीरेन लग्न करायला तयार असतांना ज्या पोरीनं त्याचं नांव बद्दू होऊं नये म्हणून खबरदारी घेऊन लग्नापासून त्याला परावृत्त केलं अशी पोर पोटीं आल्याबद्दल तुला अभिमान वाटायला हवा. तुला स्वतांला काय वाटतं तेवढं बघ. इतर लोकांची समजूत करावयाची आपल्याला गरज काय ?

**शांताबाई :** आतां आपल्या घरीं कुणी हळदीकुंकवाला देखील पाय ठेवणार नाहीं. जातीबाहेर टाकतील आपल्याला. कार्टीचं तोंडसुद्धां पहावत नाहीं !

**देवीदास :** कोण येणार नसेल तर फार बरं होईल. पण लोक आपल्याकडे आल्यागेल्याशिवाय राहाणार नाहींत.

**शशिकान्त :** आई, तूं असं कांहीं तरी तिला म्हणूं नकोस. आज अचलसारख्या मुली मिळायला नशीब हवं. ताई ! ( अचल कोपऱ्यांत तोंड लपवून उभी असते. ) आई, ताईला एका शब्दानं वाईट बोललेलं आम्हांला खपायचं नाहीं. आई असलीस तरी हरकत नाहीं. तूं तिच्या वयाची असतांना तुला तीन मुलं झालीं होतीं तेव्हां तिला दोष देण्याचा तुला अधिकार नाहीं.

माझं असं मत आहे कीं मातृपद---मग तें कोणत्याही परिस्थितीखालीं को प्राप्त--होईना, पण मातृपद हेंच स्त्रीजातीचं सर्वांत मोठं ध्येय आहे. ताई, तूं आज मानवी पूर्ततेच्या वरच्या पायरीवर जाऊन पोंचलीस याबद्दल आम्हांला उलट तुमचा हेवा वाटत आहे. ( ती रडत असते. ) ताई, रडूं नकोस. तूं देवता आहेस. उद्यांच्या जगांतून या निरर्थक देवदेवतांच्या प्रतिमा नाहींशा होऊन, देवी, तुझ्या प्रतिमा तिथं झळकतील. तुझं हें पाप ---(तिरस्कारानें हंसून)---तुझ्या दृष्टीनें नव्हे, आमच्याही दृष्टीनं नव्हे--तर बहुजनसमाजाच्या आजच्या दृष्टीनं तुझं हें पाप घेऊन तूं प्रामाणिकपणानं जगापुढं ये. आम्हांला आज कसलीच पर्वा करण्याचं कारण नाहीं. ताई, तूं आज स्त्रीजातीला खडबडून जागी केलीस. आजची स्त्रीजात तुझी नीट ओळख करून घेईल आणि उद्यांची स्त्रीजात तुझी स्वातंत्र्यदेवता म्हणून पूजा करील. बाबा, तुम्हाला लोक बहिष्कृत करतील असं वाटतं ? केलं तर फार चांगलं होईल. साडेतीन माणसांचा हा टिचभर देह पोसायला हा शशिकान्त नामर्द नाहीं. समाजानं छळ केला तर दूर कुठं जाऊन हमाली करीन; दोन वेळ भिक्षा मागेन पण तुम्हां सगळ्यांना पाठीशीं घालून जगाची दुसरी बाजू तुमच्या कायमची नजरेआड करीन. शिरीन, ताईला पुढं आण. ( शिरीन अच-

लला धरुन पुढें आणते. ) आई, बाबा, ताईला तुम्ही आ लीच म्हणाल ना ? ताई, तुला आतां अनाथाश्रमांत जाय- कारण नाहीं. आई, अशीं उदाहरणं जगांत नाहींत असं तुला वाटतं ? आज ही जी अनाथाश्रमाची भरभराट होत आहे ही काय दाखवते ? पण आपले लोक त्याबद्दल चकार शब्द काढीत नाहींत. विवाहसंस्था जोंपर्यंत नाहींशी होत नाहीं तोंपर्यंत हींच दृश्यं तुम्हांला जिकडे तिकडे दिसत राहातील आणि ह्या आपत्तींतून सुटका होण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे या अस- ल्या अनाथाश्रमांच्या घरोघर शाखा निघाल्या पाहिजेत. असो. आजपासून आपल्या आप्तेष्टांना, नातेवाईकांना, मित्र ज्यांना ज्यांना आमची वर्तणूक पसंत नसेल त्यांना आपलं अजिबात बंद. सामाजिक सुधारणेला सक्रिय सहानुभूति दाख- विण्याचा हा मान आज आपल्याला मिळाल्याचा आनंद कांहीं थोडाथोडका नाहीं.

**शांताबाई** पोरी, काय केलंस हें ! ( त्या कपाळाव हात घेऊन खालीं बसतात. )

**शशिकान्त** : ही निसर्गाची लीला ! ! !

[ अचल हळुहळू वर मान करते. शिरीन अचलचे डोळे पुसते. शशिकान्त तिचे विसकटलेले केस नीट करतो. देवीदास तिला जवळ घेऊन वात्सल्यानें तिच्या केंसावरून हात फिरवत .

ंताबाई उघड्या डोळयांनीं सगळें निमूटपणें पहातात. पडदा खालीं येतो. ]

## अंक दुसरा समाप्त.

—0—

## दुरुस्ती.

ार पृष्ठ १४ वर दहाव्या ओळींत 'नास्तिक' असा शब्द ून पडला आहे त्या जागीं 'आस्तिक' असा शब्द ाचावा.

IRBK-0100987

IRBK-0100987